❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **शनिवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २७८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

थोडक्यात...

गे डेटिंग ॲपवरून तरुणाला बोलावून लुटले

पुणे : दैनिक संध्या

गे डेटिंग ॲपच्या माध्यमातून मैत्री करून एका तरुणाला निर्जन ठिकाणी बोलावून बेदम मारहाण करत लुटल्याची घटना येरवडा परिसरात घडली. याप्रकरणी संबंधित तरुणाने (वय-२२, रा. भोसरी) विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी देवेंद्र, अरबाज आणि त्यांच्या एका साथीदाराविरोधात गुरुवारी (ता. १) गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार तरुणाला एका मुलाने डेटिंग ॲपवरून भेटण्यासाठी मेंटल हॉस्पिटल कॉर्नर येथे बोलावले. फिर्यादी तरुण तेथे पोहोचल्यानंतर आरोपींनी त्यांना पडक्या वसाहतीतील खोलीत नेले. त्या ठिकाणी तिघांनी फिर्यादी तरुणाला शिवीगाळ करत जबर मारहाण केली. त्यानंतर धमकावून त्याच्या मोबाइलमधील 'फोन पे'चा पासवर्ड मिळवून बँक खात्यातून २० हजार रुपये काढून घेतले. या प्रकाराची वाच्यता पोलिसांत केल्यास जिवे मारण्याची धमकी आरोपींनी दिली. विश्रांतवाडी पोलिस पुढील तपास करत आहेत.

गद्दार ज्ञानेश गेलेच पाहिजेत : आदित्य ठाकरे

मुंबई : दैनिक संध्या

'ज्ञानेश कुमार गेले नाहीत, तर मुंबई रस्त्यावर उतरेल. मोठ्या संख्येने मुंबईकर 'व्होट चोरी'विरोधात आंदोलन करतील,' असे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. CJPच्या मुंबईतील आंदोलनाला पाठिंबा देताना त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दरम्यान, CJPकडूनही 'Gaddaar Gyanesh MUST go' असा आक्रमक नारा देण्यात आला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी CJPकडून आज (२ ऑक्टोबर) मुंबईतील शिवाजी पार्क येथे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाला आदित्य ठाकरे यांनी पाठिंबा दर्शवला आहे. ज्ञानेश कुमार यांनी पदाचा राजीनामा न दिल्यास मुंबई मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरेल, असा इशारा त्यांनी दिला होता. CJPचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी २ ऑक्टोबरपासून मुंबईतून देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. मतदार यादीतील कथित अनियमितता आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यावरून हे आंदोलन करण्यात येत आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यापर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका CJPने घेतली आहे. या आंदोलनासाठी CJPकडून 'मुंबई चलो'चे आवाहन करण्यात आले होते. शिवाजी पार्कच्या गेट क्रमांक ६ येथे दुपारी चार वाजता आंदोलन करण्याचे जाहीर करण्यात आले. CJPने या आंदोलनासाठी 'Gaddaar Gyanu Must Go' असा नारा दिला आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून सध्या राजकीय वाद सुरू आहे. निवडणूक आयुक्तांच्या अंतर्गत मतभेदांबाबत प्रसारित झालेल्या वृत्तांवरून विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

एशियाड- भारतीय महिला हॉकी संघ

88 वर्षांनंतर सुवर्णपदक

चीनला १-० ने पराभूत केले; गोलकीपर सविताने पेनल्टी स्ट्रोक रोखला; १३व्या दिवशी ६ सुवर्णपदके



■ मुंबई (दै. संध्या)

भारतीय महिला हॉकी संघाने ४४ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. अंतिम सामन्यात संघाने चीनला १-० ने पराभूत केले. भारताचा एकमेव गोल लालरेम्सियामीने केला. यापूर्वी, भारताने १९८२ मध्ये दक्षिण कोरियाला हरवून सुवर्णपदक जिंकले होते.

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या १३ व्या दिवशी भारताने सहा सुवर्णपदके जिंकली. बॉक्सर अंकुश पांघलने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले, तर सुजीत कालकलने पुरुषांच्या ६५ किलो फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात सुवर्णपदक पटकावले. शुक्रवारी, बॉक्सर परवीन हुडाने महिलांच्या ६५ किलो वजनी गटात आणि लव्हलिना बोरगोहेनने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. एकाच आशियाई क्रीडा स्पर्धेत तीन भारतीय बॉक्सरनी सुवर्णपदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

यापूर्वी सकाळी, भारतीय महिला तिरंदाजी संघाने रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या हॉकीतील सुवर्णपदकामुळे भारताच्या एकूण सुवर्णपदकांची संख्या १६ झाली असून, पदक तालिकेत भारत पाचव्या स्थानावर आहे.

अंतिम सामन्यात मध्यंतरापर्यंत भारत १-० ने आघाडीवर होता. दुसऱ्या क्वार्टरमध्ये चीनला पेनल्टी स्ट्रोकही मिळाला, पण गोलरक्षक सविता पुनियाने अप्रतिम बचाव करत सामना बरोबरीत येण्यापासून रोखला. या विजयामुळे भारताने लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली. अंकुश पांघलने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाच्या किम मिन-सेओंगचा ४-० ने पराभव करून सुवर्णपदक जिंकले. २०१८ नंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला.

यापूर्वी, परवीन हुडाने महिलांच्या ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात चेन निएन-चेनचा ३-२ ने पराभव करून सुवर्णपदक जिंकले. लव्हलिना बोरगोहेनने महिलांच्या ७५ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात बाओ जियाचा ५-० ने पराभव करून सुवर्णपदक पटकावले. एकाच आशियाई क्रीडा स्पर्धेत तीन भारतीय बॉक्सर्सनी सुवर्णपदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

१३ व्या दिवशी ६ सुवर्णपदके

- पहिले: भारतीय महिला तिरंदाजी संघाने आज सकाळी रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक जिंकले.
- दुसरे: बॉक्सर परवीन हुडाने महिलांच्या ६५ किलो गटात सुवर्णपदक जिंकले.
- तिसरे: लव्हलिना बोरगोहेनने महिलांच्या ७५ किलो गटात सुवर्णपदक जिंकले.
- चौथे: बॉक्सर अंकुश पांघलने पुरुषांच्या ८० किलो गटात सुवर्णपदक जिंकले.
- पाचवे: अंकुशच्या सुवर्णपदकापूर्वी सुजीत कालकलने पुरुषांच्या कुस्तीच्या ६५ किलो फ्रीस्टाइल प्रकारात सुवर्णपदक जिंकले.
- सहावे: भारताने महिलांच्या हॉकीच्या अंतिम सामन्यात चीनला हरवून सुवर्णपदक जिंकले.

पुणे महापालिकेचा कारभार 'रामभरोसे'

प्रमुख अधिकारी, पदाधिकारी परदेश दौऱ्यावर

■ पुणे (दै. संध्या)

पुणे महापालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेवर कामाचा ताण असतानाच महापालिकेचे प्रमुख अधिकारी आणि सत्ताधारी पदाधिकारी विविध शासकीय तसेच वैयक्तिक कारणांसाठी परदेश दौऱ्यावर गेल्याने महापालिकेच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सलग तीन दिवसांच्या सुट्टीच्या काळात महापालिकेतील बहुतांश प्रमुख अधिकारी शहराबाहेर असल्याने अचानक आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास निर्णय घेणार कोण, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पुणे महापालिकेत एक आयुक्त आणि तीन अतिरिक्त आयुक्त कार्यरत आहेत. याशिवाय महापौर, सभागृहनेते, स्थायी समिती अध्यक्ष यांच्यासह विविध पदाधिकारी महापालिकेचा कारभार पाहतात. पुणे आणि जपानमधील ओकायमा शहराच्या मैत्रीला २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ओकायमा शहराने पुणे महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांना निमंत्रित केले होते.

या निमंत्रणानुसार महापौर मंजूषा नागपुरे, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, पीएमपीचे संचालक अजय खेडेकर, अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर आणि शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांचे शिष्टमंडळ जपान दौऱ्यावर गेले आहे. हा दौरा रविवारी पूर्ण होणार आहे. दरम्यान, आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर हे गुरुवारी (१ ऑक्टोबर) शासनाच्या जर्मनी दौऱ्यावर रवाना झाले असून त्यांचा दौरा पुढील दहा दिवसांचा आहे. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश



दिवटे हे वैयक्तिक कारणामुळे रजेवर आहेत. त्यामुळे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. शुक्रवार (२ ऑक्टोबर), शनिवार (३ ऑक्टोबर) आणि रविवार (४ ऑक्टोबर) अशा सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे महापालिकेचे नियमित कामकाज बंद आहे. मात्र, अत्यावश्यक सेवा विभागातील अधिकाऱ्यांना या काळात सतर्क राहावे लागते. अशा परिस्थितीत महापालिकेच्या प्रमुख निर्णयक्षम अधिकाऱ्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली आहे. पुण्यात गेल्या दोन दिवसांपासून एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक, पायाभूत सुविधा आणि इतर यंत्रणांवरही ताण निर्माण झाला आहे. अशा वेळी अचानक एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने निर्णय घेण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, आयुक्त नवल किशोर राम यांनी त्यांच्या अनुपस्थितीत आयुक्तपदाचा कार्यभार कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविलेला नसल्याचे सांगण्यात येत आहे.

महापालिकेतील प्रमुख अधिकारी विविध कारणांमुळे शहराबाहेर असल्याने अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर हे सोमवारपासून पुन्हा सेवेत रुजू झाल्यानंतर आयुक्तपदाचा कार्यभार सांभाळण्याची शक्यता आहे. त्यांच्याकडे अन्य दोन अतिरिक्त आयुक्तांच्या खात्यांची जबाबदारीही येण्याची शक्यता असल्याने प्रशासकीय पातळीवर कामाचा अतिरिक्त भार पडणार आहे. दरम्यान, महापालिकेचे सभागृहनेते गणेश बिडकर यांनी पदाधिकारी आणि अधिकारी शासकीय दौऱ्यावर गेल्याचे स्पष्ट करत, आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे सांगितले.

मी पुण्यात थांबण्याचे ठरविले

"महापालिकेचे पदाधिकारी आणि अधिकारी शासकीय दौऱ्यानिमित्त परदेशात गेले आहेत. आमच्यातील समंजसपणाने मी पुण्यातच थांबण्याचा निर्णय घेतला. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक ती कामे करून घेतली जातील."
- गणेश बिडकर, सभागृहनेते, भाजप

पुण्यात २२ तासांत १२३ मुलींचे अपहरण झाल्याचा दावा खोटा

सोशल मीडियावरील 'रील' निराधार, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन



■ पुणे (दै. संध्या)

शहरात गेल्या २२ तासांत १२३ मुलींचे अपहरण झाल्याचा दावा करणारी ऑडिओ क्लिप आणि रील सोशल मीडियावर व्हायरल झाली. दरम्यान, हा दावा पूर्णपणे तथ्यहीन व निराधार असल्याचे स्पष्टीकरण पोलिसांनी दिले आहे.

शहरात अशा प्रकारची कोणतीही घटना घडलेली नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. सोशल मीडियावर एका रील व ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून शहरात मोठ्या संख्येने मुलींचे अपहरण झाल्याचा खोटा दावा करून दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला जात होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस आयुक्त कार्यालयामार्फत संबंधित पोलिस ठाणे, गुन्हे शाखा तसेच सायबर सेलच्या माध्यमातून याची पडताळणी करण्यात आली. पोलिसांनी थेट संबंधित ऑडिओ क्लिप रेकॉर्ड करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन तिच्याकडे चौकशी केली. याशिवाय संबंधित सोसायटीचे व्यवस्थापन, स्थानिक पदाधिकारी, शेजारी आणि प्रत्यक्षदर्शींकडून वस्तुस्थिती जाणून घेतली. या संपूर्ण पडताळणीत शहरात १२३ मुलींचे अपहरण झाल्याचा कोणताही पुरावा, नोंद अथवा तक्रार पोलिसांकडे आढळून आलेली नाही. त्यामुळे समाजमाध्यमांवर फिरणारी ही माहिती अफवा असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

मुंबईत कॉकरोच जनता पार्टीचे जेल भरो आंदोलन

प्रत्येकाच्या टी-शर्टवर गांधीजींचे चित्र

मुंबई फक्त ट्रेलर आहे, फायनल दिल्लीत होईल

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आज मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू आहे. मंचावरील प्रत्येकाने गांधीजींचे चित्र असलेले टी-शर्ट घातले होते. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके म्हणाले, "जेव्हा भारताचे पंतप्रधान अमेरिकेला भेट देतात, तेव्हा अनेकदा म्हटले जाते की ते गांधीजींच्या देशातून आले आहेत. गांधीजी देशाचा आत्मा आहेत, आंबेडकर कणा आहेत आणि नेहरू मेंदू आहेत." आंदोलनादरम्यान, कॉकरोच जनता पक्षाने म्हटले, "मुंबई पोलिसांनी आमच्या आंदोलनाला शांततापूर्ण परवानगी दिली. मुंबई फक्त एक ट्रेलर आहे, तुम्हाला जे करायचे आहे ते करा; आम्ही अंतिम सामना जंतर मंतरवर खेळू." सीजेपीने धर्मेंद्र प्रधान (माजी शिक्षणमंत्री) यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी १९ जून ते २५ जुलै या कालावधीत दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन केले. ३६ दिवसांच्या आंदोलनानंतर प्रधान यांनी राजीनामा दिला. नीट पेपरफुटी प्रकरणानंतर सीजेपीने प्रधान यांच्या राजीनाम्याचा मुद्दा बनवला होता. SIR दरम्यान आतापर्यंत



30 राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या मसुदा मतदार यादीतून 13.37 कोटी नावे कमी झाली आहेत. निवडणूक आयोगाच्या मते, देशात एकूण 96.88 कोटींपेक्षा जास्त मतदार आहेत, म्हणजेच SIR मध्ये सुमारे 14.1% मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. दीपके यांनी गुरुवारी मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर ऑक्टोबरच्या अखेरीपासून दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन करण्यात येईल. त्यांनी असेही सांगितले की, CJP 6 ऑक्टोबर रोजी निवडणूक आयोगाविरोधात विरोधी खासदारांच्या आंदोलनात सहभागी होणार नाही. दीपके यांनी प्रश्न केला की, जर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शिवाजी पार्कमध्ये राजकीय रॅली करू शकतात, तर CJP तिथे आंदोलन का करू शकत नाही.

पूर्णेकर हत्येच्या आरोपांवर मीनाक्षी शिंदेंचा पलटवार

ऑडिओ क्लिप AI जनरेटेड; दिशा सालियान प्रकरणात ठाकरेंना अटक का झाली नाही?

■ ठाणे (दै. संध्या)

ठाण्यातील चितळसर-मानपाडा (प्रभाग क्र. ३) येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येवरून ठाकरे गटाकडून होणाऱ्या गंभीर आरोपांवर शिवसेना (शिंदे गट) नेत्या तथा ठाण्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन अत्यंत आक्रमक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. "प्रदीप पूर्णेकर यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी घटना असून त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. मात्र, या दुःखाचा गैरफायदा घेत मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे घाणेरडे राजकारण उबाठा गट करत आहे. मूळ एफआयआरमध्ये (FIR) आमचे नाव नसताना केवळ राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी एका महिलेला आणि तिच्या पतीला यात गोवण्याचा केविलवाणा प्रयत्न संजय राऊत, आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे करत आहेत," असा घणाघाती आरोप मीनाक्षी शिंदे यांनी केला.

तसेच, व्हायरल करण्यात आलेली ऑडिओ क्लिप ही बनावट आणि 'एआय जनरेटेड' असल्याचा दावा करत, "दिशा सालियान



प्रकरणात एफआयआर आणि तक्रारीत अनेकदा नाव असताना आदित्य ठाकरेंना अटक का झाली नाही?" असा सवाल करत त्यांनी ठाकरे गटालाच थेट पिंजऱ्यात उभे केले. पत्रकार परिषदेत बोलताना मीनाक्षी शिंदे यांनी ठाकरे गटाच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला. "हत्येनंतर नोंदवलेल्या मूळ एफआयआरमध्ये माझे किंवा माझ्या पतीचे नाव आरोपी म्हणून कुठेही नव्हते. मात्र, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांनी पोलीस ठाण्यात ठिय्या मारून, मृतदेहाची विटंबना करत पोलिसांवर दबाव आणला आणि पुरवणी जबाबात संशयित म्हणून आमचे नाव गोवण्याची धडपड केली. गेल्या 20 वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत मी इतके खालच्या पातळीचे राजकारण पाहिलेले नाही." "संवेदनशील परिस्थिती असताना पूर्णेकरांच्या लहान मुलाच्या तोंडातून जाणीवपूर्वक शब्द वदवून घेतले जात आहेत. रागाला डोळे आणि बुद्धी नसते, त्याचा गैरफायदा घेऊन कुटुंबीयांचे 'ब्रेनवॉश' केले जात आहे." "ठाणे पोलीस अत्यंत सक्षम असून मी आणि माझे पती चौकशीला पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहोत. उद्या विमानाचे अपहरण झाले तरी मीनाक्षी शिंदेंनीच केले असा आरोप हे करतील; पण न्यायालयात आणि कायद्यासमोर आरोपांना पुराव्यांची गरज असते," असे त्यांनी ठणकावून सांगितले. संजय राऊत यांनी समाजमाध्यमांवर शेअर केलेल्या धमकीच्या वादग्रस्त ऑडिओ क्लिपवर स्पष्टीकरण देताना त्या म्हणाल्या, "ज्या ऑडिओ क्लिपवरून माझ्यावर चिखलफेक केली जात आहे, ती क्लिप पूर्णपणे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) द्वारे जनरेट केलेली बनावट क्लिप आहे. त्या ऑडिओ क्लिपचा आणि प्रदीप पूर्णेकरांचा काडीमात्र संबंध नाही. ती क्लिप जुनी असून ज्यावेळी ती पहिल्यांदा व्हायरल करण्यात आली होती, त्याच वेळी मी सायबर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवलेली आहे. आज राजकीय हेतूने ती पुन्हा पुढे आणली जात आहे."

संपादकीय

टाटा समूहाचा वारसा जपा

"टाटा" हे नाव विचारले की भारतीयांच्या मनात केवळ एका उद्योग समूहाची प्रतिमा उभी राहत नाही तर विश्वास प्रामाणिकपणा सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ट उद्योग संस्कृतीचे एक मोठे पर्व डोळ्यासमोर येते मिठापासून ते चहापर्यंत मोटारीपासून ते विमानसेवेपर्यंत आणि आता सेमी कंडक्टर सारख्या अत्याधुनिक क्षेत्रापर्यंत विस्तारलेला टाटा समूह दीडशे वर्षाहून अधिक काळ भारतीयांच्या जीवनाचा अविभाज्य घटक राहिलेला आहे. उद्योगातील पैसा कमावणे आणि त्याचवेळी समाजाला काहीतरी परत देणे ही टाटा समूहाची ओळख राहिलेली आहे.त्यामुळे टाटा संचालक मंडळ आणि टाटा ट्रस्ट यांच्यातील मतभेद उघडपणे समोर येणे ही केवळ उद्योग जगतासाठी नव्हे तर सर्वसामान्य भारतीयांसाठी ही चिंतेची बाब आहे. सध्याच्या वादाचे तत्कालीन कारण आहे ते टाटा सन्सचे अध्यक्ष एन चंद्रशेखर यांच्या फेरनियुक्तीचे फेब्रुवारी २०२७ मध्ये आपली मुदत संपल्यानंतर पदभार सोडण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केलेली होती. मात्र १७ सप्टेंबर २६ रोजी टाटा सन्सच्या संचालक मंडळाने चार -एक (४-१) अशा बहुमताने त्यांना आणखी पाच वर्षाची मुदत वाढ देण्याचा निर्णय घेतला. टाटा ट्रस्ट कडून या निर्णयाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. तर टाटा सन्सच्या मंडळांनी आपला निर्णय अंतिम असल्याची भूमिका घेतली. विशेष म्हणजे ट्रस्टचे दोन नाम निर्देशित संचालक या प्रश्नावर वेगवेगळ्या भूमिकेत उभे राहिले आहेत. त्यामुळे हा वाद व्यक्तीच्या मतभेदा पलीकडे जाऊन टाटा समूहाच्या प्रशासनाच्या पद्धतीवर प्रशासन प्रश्न निर्माण करणारा ठरतो. टाटा समूहाची मालकी रचना आणि ट्रस्टच्या कारभाराची परंपरा ही केवळ कार्पोरेट व्यवस्थेचा विषय नसून सामाजिक उत्तरदायित्वाशी जोडलेली आहे. त्यामुळे टाटा ट्रस्टच्या निर्णय प्रक्रियेत बहुसंख्य भागधारकांच्या हिताला आणि विश्वासाला प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. असे मत देशाचे जेष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. जमशेदजी टाटा यांची दूरदृष्टी सर दोराबजी टाटा आणि सर रतन टाटा यांनी पुढे नेली. उद्योगातील निर्माण होणारी संपत्ती पुन्हा समाजाच्या हितासाठी वापरली जावी हा या विचाराचा केंद्रबिंदू होता. समूहाची मालकी कोणत्याही काही व्यक्तीकडे राहू नये. आणि व्यवसायातील बहुसंख्य भागीदारी लोककल्याणकारी उद्दिष्टांना समर्पित असलेल्या ट्रस्टकडे असावी. याच हेतूने त्यांच्या मालकीचे समभाग ट्रस्टकडे सोपवण्यात आलेले आहेत.त्यामुळे टाटा सन्सची मालकी रचना ही मुळात परोपकाराच्या तत्त्वावर आधारलेली आहे. टाटा समूहाच्या कंपन्यांमध्ये टाटा ट्रस्टचा सुमारे ६६टक्के हिस्सा असून या माध्यमातून मिळणारा लाभ आरोग्य. शिक्षण. संशोधन आणि ग्रामीण उपजीविकेच्या सारख्या क्षेत्रासाठी वापरला जातो. मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटल. टाटा मूलभूत संशोधन संस्था. आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था. आणि एनसीपीए यासारख्या संस्थांच्या उभारणीत टाटा ट्रस्टची अत्यंत महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे. ट्रस्टच्या माध्यमातून उभी राहिलेली त्यांची लोककल्याणकारी मालकी रचना जपायला हवी. भागधारकांनी स्वीकारलेल्या उपनियमावलीत अध्यक्षांच्या नियुक्तीसह महत्त्वाच्या निर्णयावर ट्रस्ट नामनिर्देशित संचालकांना दिलेल्या निर्णयाच्या निर्णायक संमतीच्या अधिकाराचा सन्मान झाला पाहिजे. १७सप्टेंबर २०२६ रोजी टाटा सन्सच्या संचालक मंडळांनी एन चंद्रशेखरं यांची पुढील पाच वर्षासाठी कार्यकारी अध्यक्ष म्हणून पुनर्नियुक्ती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी या दोन्ही प्रस्ताव विरोधात मतदान केले. तर ट्रस्टचे दुसरे नामनिर्देशित संचालक विनू श्रीनिवासन यांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. मात्र नोएल टाटा आणि वेणू श्रीनिवासन यांच्या भूमिकांमध्ये मतभेद झाले. आणि मतदानाच्या वैधतेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. या सगळ्या घडामोडी मध्ये सर्वात मोठा धोका आहे तो टाटा समूहाच्या विश्वासाला सायरस मिस्त्री यांच्या प्रकरणानंतर निर्माण झालेल्या संघर्षाच्या काळात समूहातील काही कंपन्यांच्या बाजार मूल्यावर परिणाम झाला होता आता पुन्हा सार्वजनिक संघर्ष वाढला तर त्याचा परिणाम गुंतवणूकदाराच्या विश्वासावर होऊ शकतो. मोठ्या उद्योग समूहाच्या निर्णयावर भागीदार. कर्मचारी. ग्राहक आणि बाजारपेठ यांचे बारीक लक्ष असते. त्यामुळे प्रत्येक सार्वजनिक आरोप प्रत्यारोपाची किंमत मोठी मोजावी लागण्याची शक्यता आहे. टाटा समूहासमोर आज व्यक्तीचा प्रश्न नाही तर परंपरा आणि भविष्यातील संस्थात्मक रचना यांच्यात समतोल साधण्याचे आव्हान आहे उद्योग कितीही मोठा झाला तरी त्याची खरी ताकद केवळ बाजार मूल्यात नसते ती प्रचंड विश्वासात असते. टाटा समूहाने हा विश्वास दीडशे वर्षात कमावलेला आहे. तो एका संचालक मंडळाच्या निर्णयाने किंवा एका न्यायालयात आपापसातील लढाईंनी निर्माण झालेला नाही. टाटा हे भारतीयांच्या मनात रुजलेले विश्वासाचे नाव आहे. त्या विश्वासाला तडा जाणार नाही याची जबाबदारी सर्व संचालकावर आहे मतभेद असतील तर ते असू द्यावेत पण संवादाची दारे बंद होऊ नयेत.कारण शेवटी व्यक्ती येतात आणि जातात पदे बदलतात भागधारक बदलतात मात्र संस्था टिकली पाहिजे. संस्थेपेक्षा कोणीही मोठे नाही. आणि कोणीही छोटे नाही. हा टाटा समूहाच्या विश्वासार्हतेचा गाभा आहे.आज हा वाद सोडविताना त्याच वारसाची आठवण सर्व संबंधितांनी ठेवली पाहिजे. तरच टाटाच्या विश्वासाला तडा जाणार नाही.तो अधिकच मजबूत होईल असा आशावाद सर्व सामान्य ग्राहकाना निश्चितपणे राहील.

जोगेश्वरी माता विद्यालय कबड्डी व खो-खो मध्ये तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम



■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

हवेली तालुकास्तरीय कबड्डी व खो-खो स्पर्धेत श्री क्षेत्र वाडेबोल्हाई येथील श्री जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील संघांनी उल्लेखनीय कामगिरी करीत कबड्डी व खो-खो मध्ये हवेली तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या खो-खो संघाने तसेच १९ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. सतरा वर्षे वयोगटाखालील मुलांच्या कबड्डी संघाने अंतिम सामन्यात प्रवेश केला असून अंतिम सामना लोणीकंद येथे महात्मा गांधी विद्यालय उरुळी कांचन विरुद्ध खेळला जाणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या कबड्डी संघाला राष्ट्रीय खेळाडू गणेश कुऱ्हाडे व शिक्षक शिवराज पवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर मुलींच्या खो-खो संघाला शिक्षिका पल्लवी गायकवाड यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तिन्ही संघांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद मिळविले. या यशाबद्दल श्री जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतीश धुमाळ, श्री संत तुकाराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब पठारे, सचिव दत्तात्रय काळे, शाळा समिती अध्यक्ष विद्याधर गावडे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुशाभाऊ गावडे व पंचक्रोशीतील नागरिकांनी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चंगळवाद व आजची Gen Z पिढी

■ कवठे येमाई (दै. संध्या)

आज इयत्ता 7 वी च्या वर्गात एक चित्र रोज दिसते. एका विद्यार्थ्याकडे 70 हजारांचा मोबाईल आहे, पण त्याची वही मात्र फाटलेली आहे. त्याच्या बॅगवर मोठ्या ब्रँडचा लोगो आहे, पण बॅगमध्ये पुस्तक नाही. हीच आहे आजच्या काळाची खरी ओळख, ज्याला आपण 'चंगळवाद' म्हणतो.

1997 ते 2012 दरम्यान जन्मलेली पिढी, म्हणजेच Gen Z. ही पिढी मोबाईलच्या स्क्रीनवर मोठी झाली. हातात पुस्तकापेक्षा रिमोट आणि मोबाईल आधी आला. ही पिढी सर्वात हुशार आहे, पण सर्वात गोंधळलेलीही आहे. गरज नसताना, केवळ दुसऱ्याला दाखवण्यासाठी आणि क्षणिक आनंदासाठी वस्तूंचा अतिरिक्त वापर करणे, म्हणजे चंगळवाद. पूर्वी चंगळवाद हा फक्त श्रीमंतांचा विषय होता. आज तो EMI वर गरिबांच्या घरात ही पोहोचला आहे. पाचशे रुपये कर्ज काढून दोन हजारांचा टी-शर्ट घेणे, ही आज सामान्य गोष्ट झाली आहे.1991 ला उदारीकरण आले, 2000 ला ब्रँडेड संस्कृती आली, 2010 ला स्मार्टफोन आला आणि 2016 ला Jio मुळे इंटरनेट मोफत झाले. आणि चंगळवाद थेट प्रत्येकाच्या खिशात, बेडरूममध्ये पोहोचला. 1. इंस्टाग्राम आणि इन्फ्लुएन्सर: एक इन्फ्लुएन्सर सांगतो "हा परफ्युम लावा, तुम्ही स्टायलिश दिसाल". Gen Z ला वाटते हा परफ्युम घेतला की आपलेही आयुष्य त्या इन्फ्लुएन्सरसारखे होईल. पण ती फक्त एक पेड जाहिरात असते, हे त्याला कळत नाही.



2. फास्ट फॅशन आणि सेल: Zara, H&M, Myntra वर दर आठवड्याला नवीन कलेक्शन. Big Billion Day, Great Indian Festival मध्ये 70% सूट. तीन हजाराची वस्तू पंधराशेला मिळाली म्हणून आनंद होतो, पण ती वस्तू आपल्याला गरजेची होती का? याचा विचारच केला जात नाही.

3. OTT संस्कृती: प्रत्येक वेब सिरीजमध्ये महागडी घरे, पार्ट्या, ब्रँडेड कपडे, परदेशी ट्रीप दाखवल्या जातात. Gen Z ला तेच खरे जीवन वाटू लागते.

याचा परिणाम काय होतो? - शिक्षक म्हणून वर्गात मी जे पाहतो ते विदारक आहे.

मानसिक परिणाम: इंस्टाग्रामवर सगळे श्रीमंत आणि आनंदी दिसतात. माझेच आयुष्य वाईट आहे, अशी तुलना Gen Z करू लागते. यातून नैराश्य येते. 21 व्या वर्षीच Buy Now Pay Later मुळे 50 हजारांचे कर्ज डोक्यावर असते.

शैक्षणिक परिणाम: अभ्यासापेक्षा Unboxing व्हिडिओत जास्त रस. पालकांचे 80% उत्पन्न मुलांच्या ब्रँडेड गरजा पूर्ण करण्यात जाते. SIP पेक्षा Swiggy महत्त्वाचा झाला आहे. कौटुंबिक परिणाम: "माझ्या मित्राच्या बाबांनी iPhone दिला, तुम्ही का देत नाही?" हा संवाद आज प्रत्येक घरात ऐकू येतो. मैत्री आणि प्रेमही आता किती महागडे गिफ्ट दिले यावर मोजले जाते. दिवाळी म्हणजे दिवे नाही, तर नवीन कपड्यांचे फोटो झाले आहेत.

Gen Z ला दोष देऊन उपयोग नाही. ती वाईट नाही, ती फक्त भरकटली आहे. तिला दिशा देण्याची गरज आहे.

शिक्षक म्हणून माझे तीन मंत्र:

1. 24 तासांचा नियम: काही आवडले तर लगेच घेऊ नका. 24 तास थांबा. 90% इच्छा दुसऱ्या दिवशी आपोआप संपतात.

2. किंमत तासात मोजा: 3000 रुपयांचा शर्ट म्हणजे वडिलांच्या 10 तासांच्या घामाची किंमत आहे, हे मुलांना समजावून सांगा.

3. अनुभवात गुंतवणूक करा, वस्तूत नाही: नवीन मोबाईल घेण्यापेक्षा एखादे नवीन ठिकाण पाहून या, नवीन कौशल्य शिका. वस्तूचा आनंद 2 दिवस असतो, अनुभवाचा आनंद आयुष्यभर असतो.

पालकांनी मुलांना पाकीट पैसे देऊन त्याचा हिशेब लिहायला लावावा. वाढदिवसाला ब्रँडेड वस्तू न देता पुस्तक भेट द्यावे. आणि सर्वात महत्त्वाचे, स्वतः साधे जगावे. मुलं ऐकून नाही, पाहून शिकतात.

चंगळवाद हा Gen Z चा शत्रू नाही, तो एका व्यवस्थेचा परिणाम आहे. आपण आजच जागे झालो नाही, तर उद्या आपल्याकडे ब्रँडेड कपडे असतील, पण माणुसकी नसेल..

मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

१५० नागरिकांची तपासणी, ६७ जणांची शस्त्रक्रियेसाठी निवड

■ जुन्नर (दै. संध्या)

डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आज, बुधवार दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी जुन्नर येथील ह. भ. प. गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे आश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण १५० नागरिकांनी नेत्रतपासणीचा लाभ घेतला असून, त्यापैकी ६७ गरजू रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे. जुन्नर तालुक्यात मागील तीन वर्षांपासून डिसेंट फाउंडेशन आणि शंकरा आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून ही मोफत आरोग्य सेवा सातत्याने पुरवली जात आहे. निवड झालेल्या रुग्णांना पनवेल येथे नेण्या-आणण्यासाठी प्रवास, निवास, नाश्ता, जेवण, चष्मे आणि आवश्यक औषधे या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात.

या उपक्रमाविषयी माहिती देताना डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक श्री. जितेंद्र बिडवई म्हणाले की, "जुन्नर तालुक्यात आतापर्यंत



सावरगाव ,जुन्नर,मढ,ओतूर,आळेफाटा व नारायणगाव इत्यादी ठिकाणी २५० पेक्षा जास्त शिबीरे पूर्ण झाली असून ८,००० हून अधिक नेत्ररुग्णांना पुनश्च नवी दृष्टी प्राप्त झाली आहे. 'एकही गरजू अंधारात राहू नये' हाच आमचा मुख्य संकल्प असून, या शिबिरांचा लाभ जुन्नर तालुक्यासह आसपासच्या इतर तालुक्यांतील नागरिकही मोठ्या संख्येने घेत आहेत."

प्रमुख मान्यवरांची उपस्थिती:

या कार्यक्रमाप्रसंगी माजी नगरसेवक मधुकर काजळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, शंकरा आय हॉस्पिटलचे शिबीर समन्वयक प्रकाश पाटील, डॉ. मानसी शहा व संपूर्ण वैद्यकीय टीम, माऊली आय केअर सेंटरचे विलास बोन्द्रे, शितल पवार, अरुण पापडे, समन्वयक योगेश वाघचौरे, श्रावण घोगरे आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल परिसरातील नागरिकांनी व लाभार्थ्यांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

लोकशाही व माहिती अधिकार दिनानिमित्त विशेष व्याख्यान संपन्न

■ पुरंदर (दै. संध्या)

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान संचालित, जेजुरी येथील शरदचंद्रजी पवार महाविद्यालयात राष्ट्रीय लोकशाही दिन आणि आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनाचे औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयीन सभागृहात हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी पत्रकार तथा माहिती अधिकार प्रशिक्षक गिरीश झगडे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गिरीश झगडे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्था, नागरिकांचा सहभाग, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, नागरिकांचे माहितीविषयक अधिकार, सार्वजनिक प्राधिकरणांची जबाबदारी तसेच माहितीच्या अधिकाराचा जबाबदारीने वापर



या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी जागरूक नागरिकांची भूमिका महत्त्वाची असून विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये, अधिकार व कर्तव्यांबाबत सजग राहावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पोपट झोंबाडे यांनी केले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. दिनेश राजपुरे यांनी केले तर आभार प्रा. तुषार काळे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यालय सोडण्यास मनाई

■ नारायणगाव (दै. संध्या)

राज्यात दुष्काळाची छाया पसरली असल्याने महावितरणने संपूर्ण तांत्रिक यंत्रणेला 'हायअलर्ट'वर देत शासनाच्या दुष्काळ उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे सक्त आदेश दिले आहे. याबाबत महावितरणचे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक जारी केले आहे. यंदाच्या जून महिन्यापासून राज्यात पर्जन्यमानामध्ये मोठी तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या आदेशानुसार महावितरणचे संचालक श्री. धनजंय औंढेकर (संचालन), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह सर्व कार्यकारी संचालकांनी विविध परिमंडलांमध्ये तातडीने दौरे करून दुष्काळी परिस्थितीत कृषिपंपांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी विविध तांत्रिक कामांचा आढावा घेतला तसेच वीजयंत्रणेची पाहणी करून आवश्यक उपायांचे निर्देश दिले.

तुळजाभवानी मातेच्या पलंगाच्या स्वागतासाठी भाविकांची गर्दी



■ नारायणगाव (दै. संध्या)

महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे पिंपळवंडी येथे अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. दरवर्षीच्या परंपरेनुसार, अहिल्यानगरमधील भिंगार येथील तेली समाजाच्या पलंगे घराण्यामार्फत हा पलंग पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथून श्री क्षेत्र तुळजापूरकडे नेला जातो. या प्रवासादरम्यान हा पलंग पिंपळवंडी येथे आला असता, समस्त तिळवण तेली समाज आणि स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले. पलंगाचे गावात आगमन होताच भाविकांनी खोबरे आणि भंडाऱ्याची उधळण केली. तसेच जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करून संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला.हा पलंग भाविकांना दर्शनाचा लाभ घेता यावा यासाठी पिंपळवंडी गावच्या मुख्य बाजारपेठेत ठेवण्यात आला होता. यावेळी मातेच्या पलंगाची भव्य महाआरती करण्यात आली, ज्यामध्ये शेकडो भाविक सहभागी झाले होते. महाआरती संपन्न झाल्यानंतर समस्त तिळवण तेली समाजाच्या वतीने उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारी काही वेळ विश्रांती घेतल्यानंतर, हा ऐतिहासिक पलंग देवीच्या पालखीसोबत पुढील प्रवासासाठी म्हणजेच तुळजापूरकडे मार्गस्थ झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण पिंपळवंडी परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

वडगाव-भोरवाडी रस्त्यावर भीषण अपघात

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील वडगाव-भोरवाडी रस्त्यावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. हा अपघात २९ सप्टेंबर रोजी दुपारी १२:१५ वाजण्याच्या सुमारास श्री दत्त मंदिराजवळील वळणावर घडला. या अपघातात ओमकार राजू कडाळे रा. बोरी, साळवाडी आणि गुलाब सहादू भोर वय ५५, रा. वडगाव, भोरवाडी यांचा मृत्यू झाला. तर ओमकार यांच्यासोबत दुचाकीवर असलेले आर्यन किरण साठे रा. शिरोली तर्फे आळे हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुलाब सहादू भोर हे भोरवाडी येथून वडगावच्या दिशेने दुचाकीवरून (एमएच ०४ ईजी १४८०) जात होते. याचवेळी विरुद्ध दिशेने ओमकार कडाळे आणि आर्यन साठे हे दुचाकीवरून(एमएच १४ एफजी ४१३३) येत होते. श्री दत्त मंदिराजवळील वळणावर ओमकार यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली.

ज्येष्ठ नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सतर्क राहावे : जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार

जुन्नर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात संपन्न

■ जुन्नर (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेतील कॉमन मिनिमम प्रोग्रॅमनुसार, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत शिवनेरी ज्येष्ठ नागरिक संघ, महालक्ष्मी लॉन्स, जुन्नर येथे हे शिबिर पार पडले. जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समिती, जुन्नरचे अध्यक्ष मा. एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना न्या. एस. बी. शेलार यांनी ज्येष्ठ नागरिकांनी डिजिटल युगाकडे दुर्लक्ष करून चालणार नसल्याचे सांगितले. ज्येष्ठ नागरिकांना सायबर फसवणुकीमध्ये लक्ष्य केले जाण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले. सायबर सुरक्षेच्या विषयाकडे सर्वोच्च न्यायालयानेही गांभीर्याने



पाहिले असून, 'डिजिटल अरेस्ट'सारख्या प्रकरणांबाबत न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांचाही त्यांनी उल्लेख केला. पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी नागरिकांची मूलभूत कर्तव्ये व सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद फोन व संदेश यापासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. ॲड. मारुती ढमढेरे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड. राहुल झोडगे यांनी 'घर घर में न्याय' जनजागृती, तसेच समाजातील महिलांची सुरक्षितता व गोपनीयता या विषयांवर माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे यांनी केली. कार्यक्रमाविषयीचे मनोगत ॲड. पुराणिक नलावडे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन श्री. विलास पानसरे यांनी केले, तर आभार जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे यांनी मानले. यावेळी जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. निलीमा शेरकर, सचिव ॲड. पुराणिक नलावडे, ॲड. हेमंत हाडवळे, ॲड. मारुती ढमढेरे, ॲड. राहुल झोडगे, तसेच शिवनेरी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पांडुरंग मोढवे, शरद हेंद्रे, सचिव समन्वयक विलास पानसरे, ज्येष्ठ सदस्य कारभारी डुंबरे, सुनंदा शहा, अनिल काका जोगळेकर, गोविंद हिंगे यांच्यासह शिवनेरी ज्येष्ठ नागरिक संघ व जुन्नर ज्येष्ठ नागरिक संघाचे संचालक, महिला व पुरुष सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



कल्पना दुधाळ यांचा 'करम-काव्यतेज' पुरस्काराने गौरव

पुणे : दैनिक संध्या

मी शेती करत असल्याने माझी सगळी स्वप्ने पिकांशी जोडलेली आहेत. एकत्र कुटुंब असल्याने नात्यातील गुंतागुंत अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे 'संसाराच्या रगाड्यात डोळ्यात कवितेच्या ओळींचे काजळ घालावे' अशा ओळी सुचतात. रानातील रखरखीतपणा बघताना मनात आपसुक ओलावलेले शब्द किंवा भावना म्हणजे कविता, असे भावोद्‌गार कवयित्री कल्पना दुधाळ यांनी काढले. करम प्रतिष्ठानतर्फे प्रतिष्ठेच्या 'करम – काव्यतेज' पुरस्काराने कवयित्री कल्पना दुधाळ (दौंड) यांचा रविवारी (दि. २७) गौरव करण्यात आला. त्या वेळी त्या पुरस्काराला उत्तर देताना बोलत होत्या. पुरस्कार वितरण करम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष भूषण कटककर आणि संचालिका प्रज्ञा महाजन यांच्या हस्ते झाले. सदाशिव पेठेतील अक्षरवेल सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कल्पना दुधाळ पुढे म्हणाल्या, सुचण्याच्या पातळीवर काहीतरी संवेदना असतात. कविता पूर्ण करण्याचा प्रयत्न-खटाटोप असतो. हा खटाटोप मनातले बोलणे समृद्ध करणारा असतो. भूषण कटककर यांनी प्रास्ताविकात करम प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती देत कल्पना दुधाळ यांच्या लेखनाविषयी विश्लेषण केले. ते म्हणाले, दुधाळ यांची कविता निसर्ग, ऋतू, माती, पीक, बियाणे, मेहनत, व्यथा, निसर्गछटा यांना अभिव्यक्त करत आली आहे. प्रतिमा व प्रतीकांचे उत्कृष्ट उपयोजन हे त्यांच्या कवितेचे एक मोठे गुणवैशिष्ट्य आहे. प्राजक्ता वेदपाठक यांनी सूत्रसंचालन केले. मुक्ता भुजबले यांनी परिचय पत्राचे तर वैजयंती आपटे यांनी मानपत्राचे वाचन केले. या निमित्ताने 'व्यथा बळीराजाची' या विषयावर निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. चिन्मयी चिटणीस, उमा व्यास यांनी सूत्रे सांभाळली.

वंचित विकास संस्थेला बालकार्य सन्मान पुरस्कार जाहीर

पुणे : दैनिक संध्या

सदाशिव पेठेतील श्री शिवाजी कुल स्काऊट गाईड खुले पथक आणि श्री शिवाजी कुल माजी कुलवीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'कुलरंग महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात वंचित विकास संस्थेला यंदाचा बालकार्य सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० ते ८.३० यावेळेत महात्मा फुले पेठेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन येथे हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गिर्यारोहक, एव्हरेस्टवीर व राष्ट्रीय साहस पुरस्कार प्राप्त उमेश झिरपे असून, सामाजिक कार्यकर्ते डॉ. राहुल देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, पुस्तक व रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्था १०९ व्या वर्षात पदार्पण करीत असून पुरस्कार वितरण सोहळ्याचे यंदा ९ वे वर्ष आहे. लहान मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने काम करणाऱ्या संस्थेस दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या हक्कासाठी आणि वंचित घटकांतील मुलांना शिक्षण, संस्कार, सुरक्षितता व सर्जनशीलतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'वंचित विकास' ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने कार्यरत आहे. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित मुलांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याच्या संस्थेच्या कार्याचा हा प्रवास समाजासाठी प्रेरणादायी आहे. याच वंचित विकास संस्थेचे कार्य लक्षात घेऊन संस्थेला पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच कुलरंग महोत्सवांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील सादर होणार आहे.

अंजली मालकर यांना कृष्णमुकुंद स्मृती पुरस्कार

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे संशोधनात्मक ग्रंथासाठी देण्यात येणाऱ्या कृष्णमुकुंद स्मृती पुरस्कारासाठी अंजली मालकर लिखित 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' (पूर्वार्ध आणि उत्तरार्ध) या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण समारंभ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. विजय कोपरकर यांच्या हस्ते होणार असून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण अध्यक्षस्थानी असणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

गायकाने प्रतिभा घेऊनच जन्माला यावे लागते : आरती अंकलीकर-टिकेकर

पुणे : दैनिक संध्या

गायकाने प्रतिभा घेऊनच जन्माला यावे लागते. त्याच्याकडे तळमळ तसेच प्रतिभेला साजेसा स्वभाव असणे आवश्यक असते. असे घडल्यास गायकाला गाणे आत्मसात होऊ लागते. आम्हा गायकांना आनंद आणि प्रेरणा देणाऱ्या डॉ. प्रभा अत्रे यांच्या नावे मिळालेला पुरस्कार अतिशय आनंददायी आहे. त्यांचे गाणे ऐकल्यानंतर तानपुरा काढून रियाजाला बसत स्वरांचा मागोवा घेण्याची इच्छा निर्माण होत असे, अशा भावना सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी आरती अंकलीकर-टिकेकर यांनी व्यक्त केल्या. गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्काराने आरती अंकलीकर-टिकेकर यांचा रविवारी (दि. २७) गौरव करण्यात आला. पुरस्काराचे वितरण संत साहित्याचे अभ्यासक, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या यांच्या हस्ते झाले. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित रघुनंदन पणशीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रसिद्ध अभिनेते उदय टिकेकर, गानवर्धनचे अध्यक्ष डॉ. दयानंद घोटकर, तात्यासाहेब नातू फाऊंडेशनचे अध्यक्ष शारंग नातू, डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी. मंचावर होते. ५० हजार रुपये, शाल, सन्मानचिन्ह आणि ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप होते. टिळक स्मारक मंदिर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शास्त्रीय संगीताचा प्रवास हा खडतर आणि खाचखळग्यांचा असतो, त्यात कधीतरी धडपडून, खरचटून घरी आल्यावर मलमपट्टी करणारे कुटुंबिय मोलाचे असतात, असे सांगून आरती अंकलीकर-टिकेकर म्हणाल्या, माझ्या संगीत क्षेत्रातील गुरूंसह मला भेटलेल्या सगळ्या दिग्गज कलाकारांनी मला कोणत्या ना कोणत्या रूपात काही ना काही तरी शिकविले आहे आणि आजही शिकवत आहेत. माझ्या यशात कुटुंबियांसह शिष्य आणि रसिकांचादेखील मोलाचा वाटा आहे. श्रोत्यांची दाद आणि प्रतिसादाशिवाय कुठलाही कलाकार घडू शकत नाही. गायन ही सादरीकरणाची कला असल्यामुळे गायक आणि श्रोत्यांचा संवाद याला अतिशय महत्त्व आहे. डॉ. सदानंद मोरे म्हणाले, डॉ. प्रभा अत्रे यांच्या नावे दिला जाणारा प्रतिष्ठेचा पुरस्कार माझ्या हस्ते देण्याचे भाग्य लाभले म्हणून मी दैवाचा ऋणी आहे. प्रकाशक या नात्याने मी संगीता क्षेत्राशी जोडलेला असून लहानपणी उस्ताद सईउद्दिन डागर यांच्याकडे ध्रुपद गायकीची काही वर्षे तालीम घेतली आहे. गानधर्वन संस्था तसेच स्वरमयी गुरुकुलतर्फे संगीत क्षेत्रातील गोवर्धन पर्वत उचलण्याचे कार्य घडत आहे.



डॉ. दुधभाते नेत्रालयाचा गौरवशाली टप्पा!

■ पुणे (दै. संध्या)

चाळिशीनंतर उद्भवणाऱ्या जवळच्या दृष्टीदोषामुळे चष्म्यावर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी करण्यात येणाऱ्या 'प्रेलेक्स' (PRELEX) शस्त्रक्रियांच्या क्षेत्रात डॉ. दुधभाते नेत्रालयाने ५०० हून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्याचा टप्पा गाठला आहे. अत्याधुनिक 'सेंट्युरियन गोल्ड फेकोएमल्सिफिकेशन' प्रणाली आणि 'व्हेरिऑन प्रतिमानिर्देशित तंत्रज्ञान'च्या साहाय्याने 'गॅलेक्सी'सह विविध उच्च दर्जाची कृत्रिम भिंगे प्रत्यारोपित करण्यात आली आहेत.

चाळिशीनंतर जवळचे, मध्यम अंतरावरील किंवा दूरचे पाहताना चष्म्याची गरज भासू शकते. योग्य रुग्णांमध्ये प्रेलेक्स शस्त्रक्रियेद्वारे डोळ्यातील नैसर्गिक भिंगाच्या जागी कृत्रिम भिंग प्रत्यारोपित केले जाते. त्यामुळे जवळचे, मध्यम अंतरावरील आणि दूरचे पाहताना चष्म्यावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होऊ शकते. दरम्यान, वेल्हा तालुक्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अंबादास देवकर यांनी या शस्त्रक्रियेचा त्यांचा अनुभव उपस्थित सुमारे ५५० डॉक्टरांसमोर मांडला. सहा महिन्यांपूर्वी त्यांच्या डोळ्यांमध्ये 'गॅलेक्सी' उच्च दर्जाचे कृत्रिम भिंग प्रत्यारोपित करण्यात आले होते. शस्त्रक्रियेनंतर जवळचे, मध्यम अंतरावरील तसेच दूरचे पाहताना चष्म्याची गरज भासत नसल्याचे त्यांनी सांगितले. "आज मला एखाद्या २५ वर्षांच्या तरुणासारखी स्पष्ट दृष्टी मिळाल्याचा आनंद होत आहे," अशा शब्दांत डॉ. देवकर यांनी समाधान व्यक्त केले. त्यांच्या या अनुभवातून प्रेलेक्स शस्त्रक्रियेनंतरच्या दृष्टीतील बदलांचा प्रत्यक्ष अनुभव उपस्थित डॉक्टरांसमोर आला. अत्याधुनिक शस्त्रक्रिया प्रणाली, प्रतिमानिर्देशित तंत्रज्ञान, उच्च दर्जाची कृत्रिम भिंगे आणि अनुभवी नेत्रतज्ज्ञांचे कौशल्य यांच्या माध्यमातून रुग्णांच्या गरजेनुसार उपचार नियोजनावर भर दिला जात असल्याचे डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या वतीने सांगण्यात आले. ५०० हून अधिक प्रेलेक्स शस्त्रक्रिया पूर्ण होणे हा अत्याधुनिक नेत्रसेवा आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा असल्याचे नेत्रालयाच्या टीमने नमूद केले.

'घर आमच्या हक्काचं!'; म्हाडा पुनर्विकासाविरोधात रहिवाशांचे आंदोलन



■ पुणे (दै. संध्या)

म्हाडाच्या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाला विरोध करत हाऊसिंग बोर्ड पुनर्विकास कृती समितीच्या वतीने म्हाडाच्या इमारतीसमोर आंदोलन करण्यात आले. हातात काळे झेंडे, नामफलक घेत महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच लहान मुलांसह संपूर्ण कुटुंबांनी आंदोलनात सहभाग घेत जोरदार घोषणाबाजी केली.

"घर आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं", "कोण म्हणतं देतं नाय, घेतल्याशिवाय राहत नाय" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. पुनर्विकासाच्या प्रक्रियेत रहिवाशांच्या मागण्यांचा विचार करून स्वतंत्र आणि छोट्या क्लस्टरच्या माध्यमातून पुनर्विकास करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात हाऊसिंग बोर्ड पुनर्विकास कृती समितीचे अध्यक्ष अजय बल्लाळ, म्हाडा महासंघाचे अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते, राजू बाफना, ॲड. नाना नलावडे, बाळासाहेब जानराव, राकेश मोहिते, रमेश जाधव, दिलीप म्हस्के, महेश पाटील यांच्यासह शेकडो सदनिकाधारक सहभागी झाले होते.

याप्रसंगी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी हाऊसिंग बोर्ड परिसरातील रहिवाशांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. हाऊसिंग बोर्ड येथील इमारती मोडकळीस आल्याची जाणीव असून, येत्या गुरुवारी प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. जनसामान्यांची भावना लक्षात घेऊन या परिसरात मिनी क्लस्टरच्या माध्यमातून पुनर्विकास करण्यास सहमती असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की या संपूर्ण प्रकरणात आपण स्वतः लक्ष घालणार असून, मुख्यमंत्री तसेच म्हाडाच्या उपाध्यक्षांशी चर्चा करून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू. लवकरात लवकर आराखडा (लेआउट) तयार करून येरवडा परिसरातील नागरिकांना न्याय देऊ, असे आश्वासन आढळराव पाटील यांनी दिले.

यावेळी अजय बल्लाळ यांनी एकत्रित महाक्लस्टरला कोणत्याही परिस्थितीत विरोध असल्याचे स्पष्ट केले. "दोन-तीन सोसायट्यांचे स्वतंत्र छोटे क्लस्टर करून पुनर्विकास करावा. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारले जाईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी म्हाडा व शासनाची असेल," असा इशारा त्यांनी दिला. ॲड. गणेश सातपुते यांनीही रहिवाशांच्या मागण्यांना पाठिंबा देत, "लोकमान्यनगरला जसा न्याय मिळाला, तसाच न्याय महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाच्या नागरिकांनाही मिळालाच पाहिजे. म्हाडा जोपर्यंत येथील रहिवाशांना न्याय देत नाही, तोपर्यंत आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार," असे सांगितले. "या घरात आमचं संपूर्ण आयुष्य गेलंय. आमच्या कष्टाने उभा केलेला हा संसार आहे. त्यामुळे आमच्या घराचा निर्णय आमच्याशी चर्चा न करता घेऊ नका. विकासाला आमचा विरोध नाही; पण तो आमच्या हक्काचा, आमच्या संमतीने आणि आमच्या सोयीचा असला पाहिजे. आम्हाला महाक्लस्टर नको, आमच्या सोसायट्यांचा स्वतंत्र पुनर्विकास हवा.

'स्टेट ऑफ डीपीआय इन इंडिया २०२६' अहवाल प्रसिद्ध

■ पुणे(दै. संध्या)

आयआयएम बेंगळुरू येथील सेंटर फॉर डिजिटल पब्लिक गूड्स (सीडीपीजी) (Center for Digital Public Goods (CDPG)) ने आज ई-गव्ह फाउंडेशनसोबत सहयोगाने आयआयएम बेंगळुरू येथे आयोजित करण्यात आलेल्या ॲन्युअल पॉलिसी कॉन्क्लेव्हमध्ये 'स्टेट ऑफ डीपीआय इन इंडिया २०२६' अहवालाचे दुसरे एडिशन प्रसिद्ध केले. प्रोटीअन ई-गव्ह टेक्नॉलॉजीजचे सीओओ व्ही. ईश्वरन, ई-गव्ह फाउंडेशनचे सीईओ विराज त्यागी आणि सीडीपीजीचे अध्यक्ष व आयआयएमबीच्या स्ट्रॅटेजी विभागाचे प्राध्यापक प्रा. आर. श्रीनिवासन (R Srinivasan) यांच्या हस्ते या अहवालाचे अनावरण करण्यात आले.


प्रोटीअन ई-गव्ह टेक्नॉलॉजीज लिमिटेडने प्रायोजित केलेला आणि आयआयएम बेंगळुरू येथील सीडीपीजीने तयार केलेला 'स्टेट ऑफ डीपीआय इन इंडिया २०२६' अहवाल भारताच्या डीपीआय परिसंस्थेच्या विकासाचा आढावा घेतो आणि आर्थिक सेवा, आरोग्य, कृषी, वाणिज्य व शिक्षण या पाच क्षेत्रांमधील अंमलबजावणीचे मूल्यांकन करतो. पहिल्या एडिशनमध्ये सादर केलेल्या डीपीआय मॅच्युरिटी फ्रेमवर्कवर आधारित हे दुसरे एडिशन आणखी तीन क्षेत्रांचे विश्लेषण करते आणि सामायिक डिजिटल पायाभूत सुविधा वाढत्या गुंतागुंतीच्या परिसंस्थांमध्ये साधणाऱ्या समन्वयाचे परीक्षण करते. या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, भारताने लोकसंख्या पातळीवर डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्याची आणि त्यांचा विस्तार करण्याची आपली क्षमता सिद्ध केली आहे. या अहवालातील निष्कर्ष निदर्शनास आणतात की, डीपीआय प्रवासाचा पुढील टप्पा केवळ वैयक्तिक डिजिटल मानक तयार करण्यापलीकडे जाऊन विद्यमान पायाभूत सुविधांना इंटरऑपरेबल नेटवर्क्समध्ये जोडण्याकडे, त्यांच्याभोवती डिजिटल संस्था उभारण्याकडे, आणि अधिकाधिक गुंतागुंतीच्या परिसंस्थांमध्ये विश्वासार्ह देवाणघेवाण सुलभ करण्याकडे वाटचाल करेल. "तुलनात्मक विश्लेषण आणि परस्परसंवादी व्हिज्युअलायझेशनच्या माध्यमातून 'स्टेट ऑफ डीपीआय इन इंडिया' अहवालाचे २०२६ एडिशन भारताच्या विकसनशील डीपीआय क्षेत्रावर पुराव्याधारित पाया तयार करण्याच्या केंद्राच्या प्रयत्नांना पुढे नेते, तसेच मुक्त, पुनर्वापरयोग्य आणि इंटरऑपरेबल डीपीआय सर्वसमावेशक वाढ, संस्थात्मक समन्वय आणि लवचिक सार्वजनिक सेवा परिसंस्थांना पुढे नेऊ शकते, यावरील जागतिक चर्चेत योगदान देते," असे सेंटर फॉर डिजिटल पब्लिक गुड्स (सीडीपीजी), आयआयएम बेंगळुरूचे अध्यक्ष प्रा. आर. श्रीनिवासन म्हणाले. प्रोटीअन ई-गव्ह टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. व्ही. ईश्वरन म्हणाले, "प्रोटीअनला भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या सुरुवातीच्या टप्प्यांपासून या प्रवासाचा भाग होण्याचा मान मिळाला आहे. हा प्रवास डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरच्या अवतीभोवती फिरणाऱ्या जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण चर्चेत रूपांतरित झाला आहे, हे पाहणे अत्यंत समाधानकारक आहे. आमच्यासाठी डीपीआय नेहमी केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नव्हते.

तरुण पिढीला अमली पदार्थांच्या नशेपासून दूर ठेवण्याचे मोठे आव्हान

■ पुणे(दै. संध्या)

पुणे: "अंमली पदार्थांची तस्करी, त्याचे सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या बाजारात सिंथेटीक, सेमी सिंथेटीक असे ड्रग्जचे विविध प्रकार सहज उपलब्ध होत असून, तस्करी करुन हे ड्रग्ज देशात आणले जातात. या ड्रग्जचे व्यसन व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. तरुण पिढीला या नशेपासून दूर ठेवणे हे मोठे आव्हान आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सुरक्षा व्यवस्थापन क्षेत्राचाही सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सचे अतिरिक्त अधीक्षक हिंमत जाधव यांनी केले. सुरक्षा व्यवस्थापनाच्या सक्षमीकरणात पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स भरीव योगदान देत आहेत, अशा शब्दात त्यांनी 'पीएसपी'चा गौरव केला.

पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स (पीएसपी) आणि 'एएसआयएस' इंटरनॅशनल, पुणे चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'पीएसपी-एएसआयएस कनेक्ट कॉन्क्लेव्ह'मध्ये 'ड्रग्ज फ्री पुणे' व सुरक्षित पुणे या



विषयावर हिंमत जाधव बोलत होते. पुणे स्टेशन येथील हॉटेल लेमन ट्री येथे आयोजित कार्यक्रमावेळी पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्सचे संस्थापक मंगेश काटे व सुनील बीडलम, लॉयड्स दास, ज्योती मीना, शेखर मेहता, सुमित शहा, संतोष कांबळे, 'एएसआयएस'चे अंबरीश पुरोहित, राकेश खेरवा, समीर कुमार झा यांच्यासह रहिवासी क्षेत्र तसेच रुग्णालये, नोकरीच्या ठिकाणी तांत्रिक व इतर सुरक्षा यंत्रणा पुरवणाऱ्या विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हिंमत जाधव म्हणाले, "महाराष्ट्रात २०२४ मध्ये अंमली पदार्थविरोधी पथकाची स्थापना करण्यात आली. 'से नो टू ड्रग्ज', 'ड्रगमुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेंतर्गत गेल्या दोन वर्षांपासून विविध स्तरावर काम सुरू आहे. सध्या १५ वर्षांपासून ते ३०-३५ वर्षांपर्यंतच्या व्यक्तींना ड्रग्जपासून दूर ठेवण्याचे आव्हान आमच्यासमोर आहे. मात्र त्यासाठी या व्यक्तीचे कुटुंबिय, मित्रमंडळी, शिक्षक अशा सर्वांच्या सहभागाची आवश्यकता आहे. या ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्यांना रोखणे हेही मोठे आव्हान पोलिस विभागासमोर आहे. आपली येणारी पिढी आपण चांगली घडवू शकलो नाही, तर त्यांचे भविष्य नक्कीच अवघड असेल."

प्रास्ताविकात सुमित शहा यांनी सांगितले की, "पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स (पीएसपी) फोरम हे पुण्यातील कॉर्पोरेट, औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुरक्षा, जोखीम व्यवस्थापन आणि धोक्यांचे मूल्यांकन करणाऱ्या व्यावसायिकांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे. पुण्यातील सुरक्षा व्यावसायिकांसाठी नेटवर्क उभारण्याच्या दृष्टीने २०१४ मध्ये याची स्थापना झाली. या फोरमच्या माध्यमातून बँकिंग व वित्तीय संस्था, आयटी व त्यासंबंधित सेवा, औद्योगिक वसाहती, हॉस्पिटॅलिटी आणि शिक्षण क्षेत्रातील सुरक्षा प्रमुख एकत्र येत चर्चा करतात. सुरक्षा व्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या भू-राजकीय घडामोडी, सुरक्षारक्षकांशी संबंधित आव्हाने, प्रवेश नियंत्रण प्रणाली, आपत्कालीन स्थितीतील सज्जता, जोखीम कमी करण्याच्या उपाययोजना आणि व्यवसाय सातत्य यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली जाते."मंगेश काटे म्हणाले, "सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील सुरक्षा यंत्रणांमध्ये प्रभावी भागीदारी निर्माण करणे हा 'पीएसपी' फोरमचा मुख्य उद्देश आहे. यामुळे कॉर्पोरेट सुरक्षा पथके आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणा एकत्रितपणे सुरक्षा त्रुटी ओळखणे, संभाव्य धोक्यांना प्रतिसाद देणे आणि व्यवसायांसाठी अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने काम करू शकतात. 'सुरक्षा अवॉर्ड्स'सारख्या उपक्रमांद्वारे सुरक्षा आणि जोखीम व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरवही फोरमतर्फे केला जातो. अशा उपक्रमांमुळे पुण्यातील व्यावसायिक क्षेत्रासह व्यापक समाजामध्ये सुरक्षा विषयक जागरूकता आणि सुरक्षिततेची संस्कृती अधिक बळकट करण्यास प्रोत्साहन मिळते."

सुरक्षा व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत सर्व यंत्रणांना एकत्र आणून, त्यामध्ये आणखी प्रगती कशी करता येईल व समाजाला, देशाला चांगली सुरक्षा कशी देता येईल, यावर विचारमंथन करणारा हा मंच आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांचा अनुभव, नवीन तंत्रज्ञान, सुरक्षा उपकरणे याविषयी लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते. तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुरक्षा व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

थोडक्यात पण महत्वाचे



‘वनराई बंधारा’ पुस्तिकेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी लोकसहभागातून राबविल्या जाणाऱ्या ‘वनराई बंधारा’ उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. ‘वनराई बंधारा’ या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या मुंबईतील देवगिरी निवासस्थानी नुकतेच झाले. यावेळी त्या बोलत होत्या. पुस्तक प्रकाशनावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, संस्थेचे सचिव अमित वाडेकर, वनराईचे जनसंपर्क अधिकारी शशांक गराडे उपस्थित होते. जलसंधारण, मृदासंवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासासाठी पुण्यातील वनराई संस्था गेल्या ४० वर्षांपासून महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांत कार्यरत आहे. पावसाळ्यानंतर ओढ्या-नाल्यातून आणि लहान नदीच्या पात्रातून वाहून जाणारे शेवटचे सरते पाणी अडवण्या - मुरवण्यासाठी वनराई संस्थेने वनराई बंधाऱ्याचे तंत्र विकसित केले आहे. पावसाचे पाणी अडवून ठिकठिकाणी जलसाठे निर्माण करणे, भूजल पातळी वाढवणे या उद्देशाने वनराई बंधारे उभारले जातात. स्थानिक लोकसहभागातून राबविता येणारा हा उपक्रम दुष्काळग्रस्त आणि पाणीटंचाईच्या भागांसाठी उपयुक्त ठरू शकतो, असे पवार यांनी सांगितले. बीड जिल्ह्यामध्ये भीषण दुष्काळी परिस्थिती असून या जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून प्राधान्याने बीड जिल्ह्यात वनराई बंधारे अभियान राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून आणखी १९ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पीकपंचनामे, जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यासंदर्भात प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळाच्या तीव्रतेच्या भागांत पाणीपुरवठ्यासाठी आवश्यकतेनुसार लहान क्षमतेचे टँकर वापरण्याचे तसेच चारा उपलब्धतेसाठी पर्यायी उपाययोजनांचा अभ्यास करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या परिस्थितीत जलसंधारणाच्या विकेंद्रित आणि लोकसहभागाधारित उपाययोजनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ‘वनराई बंधारा’ ही कमी खर्चात आणि स्थानिक सहभागातून उभारता येणारी जलसंधारणाची पद्धत असून, ओढे-नाल्यांमधून वाहून जाणारे पाणी ठराविक अंतरावर अडवून ते जमिनीत मुरविण्यास तिची मदत होते. त्यामुळे भूजल पुनर्भरण वाढण्यास, तसेच विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होण्यास हातभार लागतो.

आशियाई सुवर्णविजेत्या महाराष्ट्राच्या शिलेदारांचा शेखर निकम यांच्या हस्ते गौरव



मुंबई : दैनिक संध्या

Aichi-Nagoya, जपान येथे आयोजित 2026 आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय कबड्डी संघांनी पुरुष व महिला अशा दोन्ही गटांत सुवर्णपदक पटकावत देशाचा तिरंगा अभिमानाने उंचावला. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भारतीय पुरुष कबड्डी संघातील प्रमुख रेडर आस्लम इनामदार तसेच भारतीय महिला कबड्डी संघातील सोनाली शिंगाटे यांचा मुंबई येथील मंत्रालयात कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांनी सन्मानपूर्वक गौरव केला. यावेळी आस्लम इनामदार आणि सोनाली शिंगाटे यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. देशासाठी मैदानावर झुंज देत मिळवलेले हे सुवर्णपदक म्हणजे त्यांच्या अथक मेहनतीचे, जिद्दीचे आणि क्रीडाप्रती असलेल्या समर्पणाचे फलित असल्याचे यावेळी गौरवाने नमूद करण्यात आले. महाराष्ट्राच्या मातीतून घडलेले हे क्रीडाशिलेदार आज देशाच्या अभिमानाचे प्रतीक बनले आहेत. त्यांच्या यशामुळे महाराष्ट्राची मान उंचावली असून, राज्यातील हजारो युवा खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळाली आहे. “खेळाच्या मैदानावर मिळवलेले यश हे केवळ पदक नसते, तर ते असंख्य स्वप्नांना नवी दिशा देणारी प्रेरणा असते,” या भावनेतून या दोन्ही सुवर्णपदक विजेत्यांच्या पुढील वाटचालीसाठी कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राच्या शिरपेचात सुवर्णाचा मानाचा तुरा खोवणाऱ्या आस्लम इनामदार आणि सोनाली शिंगाटे यांना मनःपूर्वक सलाम.



सेवा संकल्प अभियान अंतर्गत सासवड नगरपालिकेचे स्वच्छता अभियान

सासवड : दैनिक संध्या

स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत असुन त्याचाच एक भाग म्हणून दिनांक १ ऑक्टोबर रोजी सासवड नगर पालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.सामूहिक कृतीला बळ देण्याच्या हेतूने शहरात "श्रमदान एक दिवस एक तास एक साथ" या उपक्रमांतर्गत या मोहिमेत नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण, काही नगर सेवक, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, माजी सैनिक आदी सहभागी झाले होते. पालखी तळ, सोनोरी रोड, एस टी स्टॅन्ड परिसर, पुणे रोड, गोदाजीराजे चौक ते सोपानदेव मंदिर, जेजुरी नाके आदी भागात स्वछता करत सुमारे सहा टन कचरा संकलन करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे यात सहभागी व्हावे, उघड्यावर कचरा टाकू नका, अनावश्यक कारवाई करण्यास भाग पाडू नका असे आवाहन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी या निमित्ताने केले. सदरचा उपक्रम हा शासकीय असुन व गावची स्वच्छता ही सर्वांची जबाबदारी असताना उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, बांधकाम सभापती माऊली जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, गटनेते अजित जगताप, नगरसेवक बंडू राऊत एवढेच नगर सेवक उपस्थित होते. बाकीच्यांनी याकडे पाठ फिरवली.. विरोधी गटाचा एकही नगरसेवक तिकडे फिरकला नाही.. गावाच्या विकासात्मक बाबींकडे दुर्लक्ष करणाऱ्या या लोकप्रतिनिधीच्या या गैरहजेरीची चर्चा मात्र चांगलीच रंगली.

मुलांच्या डोळ्यांवर मोबाईल-टॅबलेटच्या अतिवापराचा परिणाम


पालकांनी ‘ही’ लक्षणे दुर्लक्षित करू नयेत

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप, टीव्ही आणि ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांचा स्क्रीन टाइम मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काही वर्षांपूर्वी मुलांचा बराच वेळ मैदानी खेळ, सायकलिंग, धावणे आणि इतर बाहेरील उपक्रमांमध्ये जात असे. त्यामुळे त्यांची नजर जवळच्या तसेच दूरच्या वस्तूंवर नैसर्गिकरित्या केंद्रित होत असे. मात्र, वाढत्या स्क्रीन वापरामुळे मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या बाल नेत्ररोग विभागाच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. नीपा ठक्कर यांच्या मते, लहान वयात मुलांमध्ये मायोपिया म्हणजे जवळच्या वस्तू स्पष्ट दिसणे, मात्र दूरच्या वस्तू धुसर दिसणे, ही समस्या वाढताना दिसत आहे. अनुवंशिकता हा एक घटक असला तरी सतत जवळच्या वस्तूंकडे पाहणे आणि मैदानी खेळासाठी कमी मिळणारा वेळ यांचाही त्याच्याशी संबंध असू शकतो. संशोधनानुसार, नियमितपणे बाहेर खेळणाऱ्या मुलांमध्ये मायोपियाचा धोका तुलनेने कमी असू शकतो. नैसर्गिक प्रकाशात वेळ घालवणे आणि दूरच्या वस्तूंकडे पाहण्याची संधी मिळणे डोळ्यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरते.

स्क्रीनचा वापर कशा पद्धतीने केला जातो, हेही महत्त्वाचे आहे. स्क्रीन डोळ्यांच्या खूप जवळ ठेवणे किंवा सलग अनेक तास स्क्रीन पाहणे यामुळे डोळ्यांमध्ये दुखणे, जळजळ, वारंवार डोळे चोळणे, डोकेदुखी, लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि काही काळ दूरचे धुसर दिसणे अशी लक्षणे जाणवू शकतात. मायोपिया वाढत गेल्यास केवळ चष्म्याचा नंबर वाढण्यापुरती समस्या मर्यादित राहत नाही. भविष्यात



रेटिनाशी संबंधित समस्या, ग्लॉकोमा, कमी वयात मोतीबिंदू आणि मायोपिक मॅक्युलर डिजेनेरेशन यांसारख्या डोळ्यांच्या गंभीर समस्यांचा धोका वाढू शकतो. मुलांना अनेकदा दृष्टी कमी झाल्याची तक्रार स्वतःहून जाणवत नाही किंवा ते ती पालकांना सांगत नाहीत. त्यामुळे पालकांनी त्यांच्या दैनंदिन वागण्यात होणारे बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मूल टीव्हीच्या अगदी जवळ बसत असेल, वर्गात पुढे बसण्याचा आग्रह करत असेल, वारंवार डोळे बारीक करून पाहत असेल किंवा वाचन आणि मैदानी खेळामध्ये रस कमी झाला असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. मुलांना शक्य असल्यास दररोज सुमारे दोन तास मैदानी खेळासाठी प्रोत्साहित करावे. तसेच स्क्रीन वापरताना 20-20-20 नियम पाळणे उपयुक्त ठरू शकते. या नियमानुसार दर 20 मिनिटांनी किमान 20 फूट दूर असलेल्या वस्तूकडे 20 सेकंद पाहावे.स्क्रीन डोळ्यांपासून योग्य अंतरावर ठेवावी आणि ती डोळ्यांच्या पातळीपेक्षा किंचित खाली असावी. सलग अनेक वेळ स्क्रीन पाहण्याऐवजी मध्ये नियमित ब्रेक घ्यावा. स्क्रीन वापरताना योग्य प्रकाश, बसण्याची योग्य पद्धत आणि मनोरंजनासाठी स्क्रीनचा मर्यादित वापर यांनाही महत्त्व आहे. मुलांच्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घेणेही महत्त्वाचे आहे.

मायोपिया वाढत असल्याचे आढळल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विशेष चष्म्याची भिंगे, मायोपिया कंट्रोलसाठी कॉन्टॅक्ट लेन्स किंवा कमी डोसचे ॲट्रोपिन ड्रॉप्स यांसारखे उपचार उपलब्ध असू शकतात.तंत्रज्ञानापासून मुलांना पूर्णपणे दूर ठेवणे आजच्या काळात शक्य नसले तरी स्क्रीन टाइमसोबत मैदानी खेळ, नियमित विश्रांती आणि डोळ्यांची तपासणी यांचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे. योग्य वेळी लक्षणे ओळखून तपासणी आणि आवश्यक उपचार केल्यास मायोपियाची वाढ नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते.

व्यापाऱ्यांसाठी कल्याण आयोगासह सामाजिक सुरक्षा योजना लागू करा

अखिल भारतीय उद्योग व्यापार सुरक्षा मंचचे प्रदेशाध्यक्ष नितिन अग्रवाल यांची महाराष्ट्र सरकारकडे मागणी

■ पुणे (दै. संध्या)



व्यापारी आणि उद्योग क्षेत्र हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, करांच्या माध्यमातून शासनाच्या महसुलात मोठे योगदान देण्याबरोबरच लाखो नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यामुळे व्यापाऱ्यांची सुरक्षा, सन्मान आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने विशेष धोरणे आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी अखिल भारतीय उद्योग व्यापार सुरक्षा मंचचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नितिन अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत केली.

महाराष्ट्रात स्वतंत्र व्यापारी कल्याण आयोगाची स्थापना करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी अग्रवाल यांनी केली. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून महाराष्ट्र हे देशातील प्रमुख औद्योगिक व व्यापारिक राज्य आहे. विविध घटकांसाठी स्वतंत्र आयोग कार्यरत असताना व्यापाऱ्यांच्या समस्या, अधिकार आणि कल्याणाच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र आयोगाची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर भरणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी सरकारने सामाजिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करावी. यामध्ये विशेषतः लघु व मध्यम व्यापाऱ्यांसाठी आरोग्य सुरक्षा, अपघात सहाय्य, पेन्शन तसेच अन्य आवश्यक सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

व्यापाऱ्यांसाठी स्वतंत्र ‘व्यापारी सुरक्षा व आपत्ती मदत निधी’ स्थापन करून आग, पूर, भूकंप, दंगल किंवा अन्य नैसर्गिक व आकस्मिक आपत्तीमध्ये दुकान, गोदाम किंवा व्यावसायिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठराविक प्रक्रियेद्वारे आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, असेही अग्रवाल यांनी म्हटले आहे. राज्यातील प्रमुख व्यापारी बाजारपेठांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारून ती पोलिसांच्या नियंत्रण कक्षाशी जोडण्यात यावी, तसेच त्याच्या नियमित देखभाल व देखरेखीची व्यवस्था करावी. यामुळे चोरी, लूटमार, आगजनी यांसारख्या घटनांना आळा घालण्यास मदत होईल, असा दावा त्यांनी केला.

पूर्वा म्युझिक प्रस्तुत ‘भाई खुळावलो’ गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

■ मुंबई (दै. संध्या)

मालवणी भाषेचा खट्याळपणा, कोकणी-गोवन संगीताचा साज आणि प्रेमात पडलेल्या एका गावठी भाईची भन्नाट कथा यांचा अनोखा मिलाफ असलेलं ‘भाई खुळावलो’ हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. पुर्वा म्युझिक प्रस्तुत आणि सेव्हन सीज मोशन पिक्चर्स निर्मित या गाण्याची निर्मिती समीर परब यांनी केली असून, गाण्याचं संगीत आणि दिग्दर्शन प्रितीश प्रकाश कामत यांनी केलं आहे. गायक नागेश मुरवेकर यांच्या खट्याळ आणि मिश्कील आवाजामुळे गाण्याला अस्सल मालवणी रंग लाभला आहे. या गाण्यात अभिनेता नितीश चव्हाण आणि अभिनेत्री रुचिरा जाधव प्रमुख भूमिकेत आहेत. गाण्याच्या संकल्पनेबद्दल संगीतकार-दिग्दर्शक प्रीतीश कामत सांगतात की, "सुरुवातीला या गाण्याचे बोल मराठीमध्ये तयार करण्यात आले होते. मात्र, संगीतबद्ध करताना गाण्याला आणखी वेगळा आणि हटके टच देण्याची गरज जाणवली. त्यातून एका मुलीच्या प्रेमात पडलेल्या गावातील भाईची व्यक्तिरेखा आणि त्याची गंमतीदार प्रेमकहाणी साकारण्याची कल्पना सुचली.

‘खुळावलो’ हा मालवणी भाषेतील शब्दप्रयोग या व्यक्तिरेखेला आणि कथेला अगदी साजेसा वाटल्याने संपूर्ण गाणं मालवणी भाषेत पुन्हा साकारण्यात आलं. गाण्याच्या संगीतामध्ये मालवणी आणि कोकणी लोकसंगीतासोबत गोवन संगीताची झलक देण्यात आली असून, स्थानिक फोक आणि तारकर्लीच्या वातावरणाशी जुळणारी संगीताची वाईब तयार करण्यात आली आहे.

प्राँटोकडून पुण्यात १५० व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिर

■ पुणे (दै. संध्या)



जागतिक हृदय दिनानिमित्त झटपट घरपोच सेवा देणाऱ्या प्राँटोने पुण्यात आपल्या व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात १५० व्यावसायिकांची मोफत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करण्यात आली. हा उपक्रम प्राँटोच्या ‘पॉवर-अप, पार्टनर बेनिफिट्स’ कार्यक्रमाचा भाग आहे. व्यावसायिकांच्या आरोग्य, सुरक्षा, आर्थिक सुस्थिती आणि वैयक्तिक कल्याणाला पाठबळ देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या आरोग्य शिबिरात सीबीसी, रक्तातील साखर, क्रिएटिनिन, लिपिड प्रोफाइल, एकूण लोह, टीएसएच/टीएफटी, एचबीए१सी आणि रक्तातील सरासरी ग्लुकोज अशा आठ मोफत तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांद्वारे रक्ताचे आरोग्य, रक्तातील साखर, किडनीचे कार्य, कोलेस्ट्रॉल, लोह आणि थायरॉईडसह विविध आरोग्य निर्देशक तपासण्यात आले. या उपक्रमातून प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीच्या उपलब्धतेतील अंतरही अधोरेखित झाले. पुण्यातील सहभागी महिला व्यावसायिकांपैकी ८० टक्के महिलांनी यापूर्वी कधीही आरोग्य तपासणी केली नव्हती. त्यामुळे अनेक महिलांसाठी ही मूलभूत आरोग्य तपासणी करून घेण्याची पहिलीच संधी ठरली.

गांधी जयंतीनिमित्त पुण्यात १७ किलोमीटर ‘सत्याग्रह मार्च’

■ पुणे (दै. संध्या)



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त पुणे ॲनिमल लिबरेशनच्या वतीने प्राणी हक्क, अहिंसा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी १७ किलोमीटरच्या सत्याग्रह पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत १२० हून अधिक तरुण, सजग नागरिक आणि प्राणीप्रेमींनी सहभाग घेतला. प्राण्यांवरील अत्याचार रोखणे, डेअरी उद्योगातील प्राण्यांच्या परिस्थितीबाबत जनजागृती करणे आणि वनस्पती-आधारित आहाराला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कोथरूड येथील गांधी भवन येथून सुरू झालेली ही पदयात्रा कर्वे पुतळा, डेक्कन, फर्ग्युसन कॉलेज रोड, जंगली महाराज रस्ता, पुणे महानगरपालिका मुख्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्गे येरवडा येथील ऐतिहासिक आगाखान पॅलेस येथे पोहोचली. पांढऱ्या वेशभूषेतील कार्यकर्त्यांनी शांततेच्या मार्गाने पदयात्रा काढत नागरिकांचे लक्ष वेधले. या पदयात्रेदरम्यान विविध चौकांमध्ये प्राण्यांच्या वेदना, डेअरी उद्योगातील वास्तव आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाचे चित्रण करणारी खडू-कला साकारण्यात आली. या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. कार्यकर्त्यांनी पत्रकांचे वाटप करून विद्यार्थी, व्यावसायिक आणि नागरिकांशी संवाद साधला. भारतीय संविधानातील कलम ५१ अ (g) नुसार सर्व सजीव प्राण्यांबद्दल दया बाळगण्याच्या कर्तव्याची आठवण करून देणे, तसेच प्राण्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे, यावर या उपक्रमात भर देण्यात आला. आधुनिक पशुपालन आणि डेअरी उद्योगातील प्राण्यांच्या परिस्थितीबाबत जनजागृती करताना वनस्पती-आधारित आहाराचा पर्यायही मांडण्यात आला. पदयात्रेदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय आणि पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे विविध मागण्यांची निवेदने सादर करण्यात आली. प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे, जिल्हा प्राणी क्रूरता प्रतिबंधक समिती (SPCA) सक्रिय करणे, शासकीय खरेदीमध्ये वनस्पती-आधारित आहाराला प्रोत्साहन देणे, तसेच अस्वच्छ व बेकायदेशीर मांसविक्री केंद्रांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा : पिंपरी-चिंचवडकर नोंदवणार नवा विश्वविक्रम

मोशीत ४ ऑक्टोबरला हजारो ढोल-ताशांचा निनाद | स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’ आणि धर्मध्वजाला ऐतिहासिक मानवंदनेचा संकल्प | १११ शंखांचा शंखनाद, शिवशंभो गर्जना, शाहिरी आणि मर्दानी खेळांचा थरार; सर्वांसाठी मोफत प्रवेश

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

महाराष्ट्रभरातील ढोल-ताशा पथकांच्या साथीने पिंपरी-चिंचवडकर नव्या विश्वविक्रमाचा संकल्प साकारण्यासाठी सज्ज झाले आहेत. हजारो ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद, शिवभक्तीपर गीतांचा जागर आणि मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके अशा सादरीकरणांनी मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा रंगणार आहे. यासाठी पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’ला आणि उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या ‘धर्मध्वज’ला मानवंदना देण्यासाठी रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बो-हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात कार्यक्रम होणार असून, सर्व नागरिकांसाठी प्रवेश मोफत आहे. हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ,



महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात शौर्य, सांस्कृतिक परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळणार आहे. गतवर्षी ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’ला ढोल-ताशांच्या विश्वविक्रमी निनादातून मानवंदना देण्यात आली होती. त्या सोहळ्याची प्रेरणा घेऊन यंदा अधिकाधिक पथकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. महाराष्ट्राच्या रणवाद्य परंपरेचा वारसा जपणारी पथके राज्यभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत.

“गतवर्षीच्या ऐतिहासिक मानवंदनेचा अनुभव आजही पथकांच्या मनात ताजा आहे. यंदा पाच हजारांहून अधिक वादक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी सज्ज आहेत. सर्व पथकांच्या एकत्रित वादनातून घुमणारा निनाद हा सोहळ्यातील सर्वांत महत्त्वाचा क्षण असेल.”

— पराग ठाकूर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, ढोल-ताशा महासंघ

“धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली स्मृतींना वंदन करण्यासाठी आणि निर्माणाधीन धर्मध्वजाला ऐतिहासिक मानवंदना देण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे. १२८ मीटर उंच उभारण्यात येत असलेल्या भगव्या ध्वजाला हजारो ढोलवादकांच्या सामूहिक वादनातून विश्वविक्रमी मानवंदना देण्याचा आमचा संकल्प आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही शिव-शंभूप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा.”

— गणेश महाराज भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट.

विविध पथकांच्या सामूहिक वादनातून नवा विश्वविक्रम नोंदविण्याचा आयोजकांचा संकल्प असून, विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रमानंतर होईल.पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेला १२८ मीटर उंच धर्मध्वज जगातील सर्वांत उंच भगवा ध्वज ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या निर्माणाधीन धर्मध्वजाच्या गौरवार्थही हजारो वादक मानवंदना देणार आहेत.

सोहळ्यात १११ शंखांचा सामूहिक शंखनाद हे विशेष आकर्षण असेल. त्यासोबत शिव-शंभूंच्या विचारांचा जागर करणारा ‘शिवशंभो गर्जना’ हा शिवभक्तीपर सांगीतिक कार्यक्रम सादर होणार आहे. ढोल-ताशांचा ठेका आणि शिवभक्तीपर गीतांच्या सुरांतून शिव-शंभूंच्या पराक्रमाला वंदन करण्यात येणार आहे.

शाहीर चंद्रकांत माने यांचे ‘स्वराज्याचं तोरण बांधील’ विशेष सादरीकरण आणि शाहीर खुपिरे यांच्या शाहिरी कार्यक्रमाचा सोहळ्यात समावेश आहे. शाहिरीच्या बुलंद ललकारीतून शिव-शंभूंच्या शौर्यगाथांचा जागर होणार आहे. तसेच पारंपरिक युद्धकलेचा वारसा उलगडणाऱ्या मर्दानी खेळांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांतून उपस्थितांना शौर्य आणि कौशल्याचा थरार अनुभवता येणार आहे.

सांस्कृतिक सादरीकरणांसोबत व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेशही दिला जाणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ‘नशामुक्त भारत अभियान’अंतर्गत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे. स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजाला जागरूक करण्याचा संकल्प उपस्थित करतील. संपूर्ण ‘वंदे मातरम्’च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात येणार आहे.

शिव-शंभूप्रेमी, सांस्कृतिक चळवळीतील कार्यकर्ते आणि नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ‘इतिहास घडतोय... साक्षीदार व्हा!’ अशी साद घालत या ऐतिहासिक मानवंदनेचे निमंत्रण देण्यात आले आहे.

एशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला तिरंदाजी संघाचा सुवर्णवेध

■ पिंपरी (दै. संध्या)

एची-नागोया एशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला कंपाऊंड धनुर्विद्या संघाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य चीन संघाचा 238-234 अशा गुणांनी पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयात पिंपरी-चिंचवडची कन्या प्रिथिका प्रदीप हिने महत्त्वपूर्ण योगदान देत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

भारतीय महिला संघात प्रिथिका प्रदीप, ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिता तनीपार्थी यांचा समावेश होता. अंतिम सामन्यात भारतीय संघाने सुरुवातीपासूनच अचूक निशाणेबाजीचे प्रदर्शन करत चीनवर वर्चस्व राखले. भारताचा 238 गुणांचा अंतिम स्कोअर हा दक्षिण कोरियाने 2014 मध्ये नोंदवलेल्या जागतिक विक्रमाशी बरोबरी करणारा ठरला. उपांत्य फेरीत भारताने दक्षिण कोरियाचा 234-233 अशा अत्यंत चुरशीच्या लढतीत पराभव करून अंतिम फेरी गाठली होती. त्यानंतर अंतिम सामन्यातही भारतीय महिला तिरंदाजांनी संयम आणि कौशल्याचे दर्शन घडवत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.

विशेष म्हणजे, भारतीय महिला कंपाऊंड संघाने एशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ज्योती सुरेखा वेन्नम यांचे हे एशियाई क्रीडा स्पर्धेतील चौथे सुवर्णपदक ठरले, तर प्रिथिका प्रदीप आणि चिकिता तनीपार्थी यांनी आपल्या पहिल्याच एशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान मिळवला. प्रिथिका प्रदीपच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अभिमानाने झळकले आहे. शहरातील पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या धनुर्विद्या विकासाच्या प्रयत्नांना या यशामुळे नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली आहे. पिंपरी-चिंचवडमधून घडलेली खेळाडू एशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक जिंकते, ही संपूर्ण शहरासाठी गौरवाची बाब मानली जात आहे. तिच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्रासह देशभरातील युवा धनुर्धारकांना प्रेरणा मिळणार आहे.



■ पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिका प्रदीपची ऐतिहासिक कामगिरी

प्रिथिकाच्या यशामागे प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तांत्रिक प्रशिक्षण आणि मेहनत महत्त्वाची ठरली आहे. तसेच तिच्या पालकांनी दिलेला पाठिंबा, विश्वास आणि प्रोत्साहन हेही तिच्या यशाचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात आहेत.

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेच्या सहसचिव तथा पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या सचिव सोनल बुंदेले यांनी प्रिथिकाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, "प्रिथिकाची गुणवत्ता आणि तिच्यातील विशेष टॅलेंट शालेय वयात असतानाच ओळखण्याची संधी मला मिळाली होती. तिची जिद्द, मेहनत, शिकण्याची तयारी आणि खेळाप्रती असलेली निष्ठा आज एशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकापर्यंत पोहोचली आहे, याचा अभिमान वाटतो. तिचे हे यश पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र आणि भारतासाठी गौरवाची बाब आहे. या यशामुळे अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल." त्या पुढे म्हणाल्या, "प्रिथिकाची मेहनत, प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे मार्गदर्शन आणि तिच्या पालकांचा भक्कम पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाले आहे. भविष्यातही पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंना योग्य प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू.

पिंपरी-चिंचवड शहर भाजपाच्या सरचिटणीसपदी पटनी यांची नियुक्ती

■ पिंपरी(दै. संध्या)



भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीसपदी संजय पटनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रसिद्धीप्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलेल्या पटनी यांच्यावर पक्षाने आता सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली आहे.

पटनी हे गेल्या २० वर्षांपासून आमदार महेश लांडगे यांच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत सक्रिय सहभागी आहेत. पक्षाचे कार्यक्रम, संघटनात्मक उपक्रम आणि भाजपा परिवारातील विविध संस्था व संघटनांच्या कार्यात त्यांचा सातत्याने सहभाग राहिला आहे. शहरातील राजस्थानी, मारवाडी आणि हिंदीभाषिक समाजातील विविध घटकांशी त्यांचा व्यापक जनसंपर्क आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील सर्व ४८३ बूथवर सलग चार महिने शंभर टक्के यशस्वी आयोजन करण्यासाठी पटनी यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी समन्वय साधून कार्यक्रमाच्या आयोजनात त्यांनी योगदान दिले.

पटनी यांच्या नियुक्तीबद्दल आमदार महेश लांडगे यांनी आनंद व्यक्त केला. गेल्या दोन दशकांतील त्यांची साथ, निःस्वार्थ पक्षकार्य आणि कार्यकर्त्यांशी असलेले आत्मीय संबंध मोलाचे आहेत. त्यांच्या निष्ठेला आणि समर्पित कार्याला पक्षश्रेष्ठींनी योग्य न्याय दिल्याची भावना लांडगे यांनी व्यक्त केली. पटनी यांच्या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा शहरातील पक्षसंघटनाला लाभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नियुक्तीनंतर पटनी यांनी पक्षनेतृत्व, आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि सहकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले. यावेळी संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकासजी डोळस, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, नगरसेवक उदय गायकवाड, नगरसेवक सागर गवळी आणि सहकारी उपस्थित होते पक्षाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षसंघटन बळकट करणे, समाजातील विविध घटकांशी संवाद वाढवणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणे याला प्राधान्य देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

"पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाच्या सरचिटणीसपदी माझी नियुक्ती करून पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. आमदार महेशदादा लांडगे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पाठबळ माझ्यासाठी मोलाचे आहे. शहराध्यक्ष शत्रुघ्नजी काटे, पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि सर्व सहकारी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने ही जबाबदारी निष्ठेने पार पाडेन. पक्षसंघटन अधिक बळकट करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी काम करणे याला माझे प्राधान्य राहील. माझ्यावर दाखवलेला विश्वास समर्पित कार्यातून सार्थ ठरवेन, असे संजय पटनी, सरचिटणीस, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपा यांनी सांगितले.

महापालिकेच्यावतीने साजरा होणार अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस आणि अभिजात मराठी भाषा सप्ताह



■ पिंपरी(दै. संध्या)

अभिजात मराठी भाषेचा जागर करण्यासाठी तसेच मराठीचे संवर्धन आणि प्रचार प्रसार करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ३ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस तसेच ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह विविध कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. यामध्ये साहित्यिक चर्चा, परिसंवाद, कविसंमेलन, कथाकथन, अभिवाचन यातून मराठीचे अंतरंग उलगडले जाणार आहेत. तर नाटक, सांगितिक कार्यक्रम, एकांकिका, लोककला, लावणी, गझल असा वैविध्यपुर्ण कार्यक्रमांतून अभिजात मराठीचा जागर केला जाणार आहे. या महाउत्सवाचे उद्घाटन ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये होणार आहे. या कार्यक्रमामध्ये सुप्रसिद्ध ज्येष्ठ संगीतकार पद्मश्री पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा महापालिकेच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान देखील केला जाणार आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली आहे. अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी सहभाग घेऊन मराठी भाषा संवर्धनाची लोकचळवळ अधिक गतीमान करावी असे आवाहन देखील डॉ. सूर्यवंशी यांनी केले आहे. महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर, सांगवी येथील निळु फुले नाट्यगृह, चिखली येथील चिखली टाऊनहॉल आणि आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी विनामूल्य असणार आहेत. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता सनई, हलगी, संबळ आदी पारंपरिक वाद्यांच्या निनादात अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता वैशाली पळसुले आणि सहकाऱ्यांचा 'गणेश वंदना, कथक व लावणीची जुगलबंदी' हा कार्यक्रम, सकाळी अकरा वाजता मोरया थिएटर्सचा 'अंतर्नाद - अ जर्नी टू दी सोल' हा नाट्य-संगीतमय आविष्कार सादर होणार आहे. सायंकाळी तीन वाजता सुप्रसिद्ध संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात येणार असून, सायंकाळी चार वाजता 'गाणी मंगेशकरांची' हा त्यांचा विशेष सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. रात्री नऊ वाजता अशोक हांडे प्रस्तुत 'मंगलगाणी दंगलगाणी' या संगीतमय रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता अथर्व थिएटर, चिंचवड यांची 'भिरभिर' ही एकांकिका, सकाळी दहा वाजता अस्मिता युवा मंच, पुणे यांची 'इन दि नेम ऑफ' ही एकांकिका सादर होणार आहे. दुपारी साडेबारा वाजता संकर्षण कऱ्हाडे अभिनीत 'नियम व अटी लागू' हे नाटक, सायंकाळी पाच वाजता धनंजय म्हसकर, अमोल बावडेकर, योगिता गोडबोले, प्रिती निमकर आणि अनघा पेंडसे यांच्या सहभागातून 'धरित्रीच्या लेकी' हा कार्यक्रम होणार आहे. रात्री साडेनऊ वाजता 'द फोक महाराष्ट्र - ओळख माझ्या महाराष्ट्राची' या महाराष्ट्राच्या लोककलेच्या भव्य सोहळ्याचे सादरीकरण होणार आहे. सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता रविरा एंटरटेनमेंटची 'नंतर कधीतरी' ही एकांकिका सुबोध जोशी यांच्या दिग्दर्शनाखाली सादर होणार आहे. दुपारी बारा वाजता संतोष पवार लिखित-दिग्दर्शित 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे' या नाटकात सागर कारंडे, शलाका पवार आणि सायली देशमुख भूमिका साकारणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता सचिन खेडेकर अभिनीत आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'भूमिका' हे नाटक, तर रात्री साडेनऊ वाजता लोकजागर ऍक्टिव्हिटीजचा सणांवर आधारित संगीत-नृत्यमय कार्यक्रम 'सणयात्रा' सादर होणार आहे.

मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता मॉडर्न थिएटर, निगडीची 'सोळाशे पन्नास' ही एकांकिका, सकाळी दहा वाजता नाट्यसत्ताक संस्था, पुणे यांची 'कॉर्पोरेट कबुतर' ही एकांकिका सादर होणार आहे. दुपारी बारा वाजता मयुरेश पेम, मनमीत पेम, विकास पाटील आणि रिचा अग्निहोत्री यांच्या सहभागातून देवेंद्र पेम यांचे 'ऑल दि बेस्ट' हे नाटक, सायंकाळी साडेपाच वाजता विराजस कुलकर्णी दिग्दर्शित 'वरवरचे वधूवर' हे नाटक सखी गोखले, सुव्रत जोशी आणि सूरज परसनीस यांच्या अभिनयातून सादर होणार आहे. रात्री साडेनऊ वाजता मानसी-अंजन प्रस्तुत 'सूर वेली' हा सांगीतिक प्रवास रंगणार आहे.

छायाचित्रांचे विशेष प्रदर्शनाचे आयोजन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्त माध्यम प्रतिनिधींनी टिपलेल्या निवडक छायाचित्रांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सार्वजनिक घडामोडींचे चित्ररूप दस्तऐवजीकरण करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींच्या नजरेतून टिपलेले विविध पैलू या प्रदर्शनातून रसिकांना अनुभवता येणार आहेत. हे प्रदर्शन दि. ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथील कला दालनात सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

'ग्रीझीच्या गुहेत चिंटुची धमाल' हे बालनाट्य

चिखली टाऊन हॉल येथे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'ग्रीझीच्या गुहेत चिंटुची धमाल' हे बालनाट्य, तर सायंकाळी पाच वाजता ज्ञानेश्वर मेश्राम, कल्याणी देशपांडे आणि सहकाऱ्यांचा अभंग व भक्तीगीतांचा 'अभंगवारी' हा कार्यक्रम होणार आहे.


पिंपरी-चिंचवडमध्ये ऑक्टोबर हिटचा तडाखा

■ पिंपरी(दै. संध्या)

ऑक्टोबर हिटचा तडाखा पिंपरी-चिंचवडकरांना बसू लागला आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरातील कमाल तापमानात मोठी वाढ झाली असून, बुधवारी शहराचे कमाल तापमान ३४.७ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. सकाळपासूनच कडक ऊन आणि दमट हवामानामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सून परतीच्या प्रवासावर असला तरी आर्द्रता अजूनही 70 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

त्यामुळे तापमान ३४ अंश असले तरी प्रत्यक्षात ३८ ते ३९ अंशापेक्षा जास्त गरम जाणवत आहे. वाकड, हिंजवडी, भोसरी, निगडी या आयटी आणि औद्योगिक पट्ट्यात उन्हाचा सर्वाधिक फटका बसत आहे. दुचाकीस्वार, बांधकाम कामगार आणि शाळेतील मुलांना या उन्हाचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पुढील ३ ते ४ दिवस शहरात अशीच स्थिती राहणार आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



३.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

पिंपरी : दैनिक संध्या

घरफोडी आणि दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना भक्ती-शक्ती चौकात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोघांची बॅग तपासली असता घरफोडीचे साहित्य आढळून आले. त्यानंतर केलेल्या चौकशीत दोन घरफोड्या आणि चार दुचाकी चोरी अशा सहा गुन्ह्यांची उकल झाली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने ही कारवाई केली असून, तीन लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. विकास ऊर्फ जंगल्या मिलिंद कांबळे (३५, रा. पिंपरी) आणि गौतम धर्मलिंगम नाडार (२८, रा. राजगुरुनगर, ता. खेड) अशी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. पुढील कारवाईसाठी त्यांना काळेवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट एकचे पथक सोमवारी (दि. २९) घरफोडी आणि दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने गस्त घालत होते. भक्ती-शक्ती चौकातील पीएमपीएमएल बसथांब्याजवळ दोन जण संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन पंचांसमक्ष बॅगची झडती घेतली. त्यामध्ये मोठे स्क्रू ड्रायव्हर, हातोडा, छन्नी आणि करवत असे घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य मिळून आले. दोघांकडे कसून चौकशी केली असता काळेवाडी आणि मार्केट यार्ड पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील प्रत्येकी एक घरफोडी, तसेच चिखली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक आणि संत तुकारामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तीन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. या गुन्ह्यांतील दुचाकींसह एकूण तीन लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. पोलिस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, सहायक पोलिस आयुक्त डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक रामेश्वर मोताळे, पोलिस उपनिरीक्षक कर्मराज गावडे तसेच पोलिस अंमलदार विजय शेळकंदे, मनोज राठोड, अजय डगले, उद्धव खेडकर, संदेश देशमुख, विजय जानराव आणि तेजस भालचिम यांच्या पथकाने ही कारवाई केली.

भाग्यश्री सोनकांबळेची राज्यस्तरीय निवड



पिंपरी : दैनिक संध्या

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. ए. बी. तेलंग महाविद्यालय, निगडी येथील एस. वाय. बी.ए.ची विद्यार्थिनी कु. भाग्यश्री राजू सोनकांबळे हिची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व-परेड निवड प्रक्रियेत राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी निवड झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २२ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पूर्व-परेडसाठी विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या निवड चाचणीतून राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या अधिकृत यादीत भाग्यश्री राजू सोनकांबळे हिचे नाव क्रमांक २ वर नोंदविण्यात आले आहे. भाग्यश्री सोनकांबळे हिची पुढील राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी निवड झाली असून, हे शिबिर १२ ते १४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी होण्यासाठी निवड झालेल्या स्वयंसेवकांना निर्धारित वेळेत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

FDA नमुने प्रयोगशाळेत, अहवालाची प्रतीक्षा

■ पिंपरी(दै. संध्या)

चिंचवड येथील प्रदीप स्वीट्सवर अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने केलेल्या कारवाईतील खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. संबंधित नमुन्यांचा प्रयोगशाळेचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याने हे खाद्यपदार्थ आरोग्यास धोकादायक अथवा असुरक्षित असल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही.

एफडीएच्या पथकाने चिंचवड येथील प्रदीप स्वीट्सची तपासणी केली होती. या तपासणीदरम्यान दुकानातील काही खाद्यपदार्थांचे नमुने घेण्यात आले. हे नमुने त्यांच्या दर्जा व सुरक्षिततेची खातरजमा करण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. दरम्यान, गुरुवारी (दि. १) दैनिक पुढारी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तातील अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रियेमध्ये 'आरोग्यासाठी धोकादायक खाद्यपदार्थ सापडले' असा उल्लेख अनावधानाने प्रसिद्ध झाला आहे. प्रत्यक्षात प्रदीप स्वीट्समधून खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रयोगशाळेचा अहवाल येण्यापूर्वी संबंधित खाद्यपदार्थ धोकादायक असल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षानुसार अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. प्रदीप स्वीट्समधील तपासणीदरम्यान काही खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. संबंधित खाद्यपदार्थ धोकादायक असल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच त्याची गुणवत्ता आणि सुरक्षिततेबाबत स्पष्टता येईल.

पहिल्या सहामाहीत मालमत्ता कराची विक्रमी वसुली!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ६१० कोटी ४४ लाखांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. पहिल्या सहामाहीत विविध कर सवलतींचा लाभ घेत कर भरणाऱ्यांचा आलेख झपाट्याने वाढत आहे. यंदा ७ लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्ता धारकांपैकी ५ लाख ९ हजार २०० नागरिकांनी म्हणजे तब्बल ६६.४७ टक्के मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. दरवर्षीप्रमाणे ऑनलाइन माध्यमातून बिल भरण्यास नागरिकांनी मोठी पसंती दिली आहे.

शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ७ लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा एसएमएस पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे पहिल्या सहामाहीत कर भरणाऱ्यांचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे.



गतवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत ४ लाख ७८ हजार २६८ मालमत्ता धारकांनी ६०३ कोटींचा कर भरणा केला होता. यंदा नोंदणीकृत ७ लाख ६६ हजार मालमत्ता धारकांपैकी ५ लाख ९ हजार २०० मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी तब्बल ६१० कोटी ४४ लाख रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. गतवर्षापेक्षा ६ कोटी ६२ लाख रुपयांची अधिकची वसुली झाल्याचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन कर भरण्याच्या सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या कराचा भरणा करणे शक्य झाले आहे. या सुविधेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पहिल्या सहामाहीत

शहिद जवान अजित बागाव यांच्या अंत्यविधीला शासकिय अधिकारी गैरहजर

■ सातारा (दै. संध्या)

■ संबंधितांवर कारवाईची मागणी

शहीद जवान अजित बाळासाहेब बागाव यांच्या अंत्यविधीप्रसंगी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी आज जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. भारतीय सैन्य दलात जम्मू येथे कर्तव्य बजावत असताना जवान अजित बागाव यांना वीरमरण आले.त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असताना प्रशासनातील काही महत्त्वाचे अधिकारी उपस्थित नसल्याचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. शहीद जवानाला शासकीय इतमामाने व सन्मानाने अंतिम निरोप देण्याच्या प्रक्रियेत प्रशासनाची नेमकी भूमिका काय होती, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात प्रांताधिकारी, नगरपरिषद मुख्याधिकारी तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी संबंधित शासकीय पत्रव्यवहार, आदेश, उपस्थिती नोंद तसेच अंत्यविधीस्थळी उपलब्ध असलेले ड्रोन चित्रीकरण व इतर व्हिडिओ फुटेज तपासण्यात यावे,अशी मागणी करण्यात आली.अधिकाऱ्यांना कार्यक्रमाबाबत पूर्वसूचना देण्यात आली होती का? संबंधित जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली होती? आदेशानंतरही अधिकारी अनुपस्थित राहिले असल्यास त्यामागील कारण काय होते? याची वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

"शहीद जवानाच्या सन्मानाचा विषय हा अत्यंत संवेदनशील आहे.त्यांच्या अंतिम निरोपाच्या वेळी प्रशासनाची जबाबदारी निश्चित असताना कोणतीही दिरंगाई अथवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे," अशी भूमिका DP। युवक अध्यक्ष मंगेश प्र.आवळे यांनी व्यक्त केली.या वेळी ऋषिकेश गायकवाड (रावण),निलेश घोलप आणि आदित्य पाटोळे उपस्थित होते. शहीद जवान अजित बागाव यांच्या बलिदानाचा सन्मान राखत प्रशासनाने या प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना स्कूल बॅग

■ लोणी भापकर (दै. संध्या)



आंब्याची रोपे व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप

आमदार रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त उंड्री येथील उद्योजक योगेश राजाराम कामठे यांच्या संकल्पनेतून लोणी भापकर येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग,आंब्याच्या झाडांची रोपे व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.योगेश कामठे यांनी आपल्या स्वखर्चातून हे साहित्य उपलब्ध करून दिले.कोणत्याही पदाची अपेक्षा किंवा व्यक्तिगत लाभाची अपेक्षा न ठेवता सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.शाळेला भविष्यातही आवश्यक ती मदत करण्यासाठी आपण सदैव तत्पर असल्याचे योगेश कामठे यांनी यावेळी सांगितले.या कार्यक्रमास बारामती ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाची संकल्पना योगेश राजाराम कामठे यांची असून सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्ट,लोणी भापकर यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टचे अध्यक्ष जयदीप भापकर यांनी प्रास्ताविक केले.यावेळी त्यांनी ट्रस्टच्या आगामी सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली.त्यानंतर प्रमुख पाहुणे राजेंद्र पवार यांनी मनोगत व्यक्त केले.शाळेचे मुख्याध्यापक संदीप जगताप यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने स्वर्गीय माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मरणार्थ विशेष पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लोणी भापकर गावात प्रत्येक लहान मुलाचा जन्म झाल्यानंतर त्या बालकाच्या घरी जाऊन वृक्षारोपण करण्यात येणार आहे.नवजात बालकाच्या जन्माचा आनंद साजरा करण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा संकल्प ट्रस्टने केला आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन कदम यांनी केले,तर सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टचे सतीश अमराळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाची माहिती सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टचे शरद भापकर यांनी दिली.

यावेळी योगेश कामठे, जीवन कामठे, रवी.जी.श्रीवास्तव, शाळेचे सचिव व सहसचिव विजयसिंह भापकर, उदयसिंह भापकर, शाळेचे खजिनदार त्रिंबक भापकर, निवृत्त हेड क्लार्क सुभाष भापकर, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय भापकर, पत्रकार विजय गोलांडे,शालेय समितीचे प्रमुख मनोज साठे, सेवानिवृत्त सैनिक गणेश भापकर, अनिल भापकर, भीमराव यादव तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

निसार पटेल, सिराज मणियार, राजू कदम राज्यस्तरीय कलारत्न गौरव पुरस्काराने सन्मानित

■ नारायणगाव (दै. संध्या)



द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या तिसऱ्या वर्धापन दिनाचे आयोजन पुण्यभूमी आळंदी येथे द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष अन्वर भाई शेख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी ताशा सम्राट निसार भाई पटेल, ताशा किंग सिराजभाई मणियार आणि सनई सम्राट राजू कदम यांना राज्यस्तरीय कलारत्न गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. द युवा ग्रामीण पत्रकार संघ वर्धापन दिनाच्या निमित्ताने संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष अन्वर शेख,नराज्यध्यक्ष शकील मणियार,ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज,ह.भ.प रमेश महाराज वसेकर,संत श्री शिरोमणी सावता महाराज यांचे १८ वे वंशज,ह.भ.प पुरुषोत्तम महाराज मोरे जगद्गुरु संत तुकाराम महाराज संस्थान विश्वस्ताध्यक्ष, सौ. वैजंताताई उमरगेकर माजी नगराध्यक्षा, अनंत कराड संस्थापक एकता फाउंडेशन, मनोज जाधव समाज कल्याण अधिकारी, सौ.मंगल सासवडे महिला राज्यध्यक्ष, रोहित वाळके इलेक्ट्रॉनिक मि.राज्याध्यक्ष, सौ.अर्चना चासकर राज्यसचिव, पुणे जिल्हाध्यक्ष काशिनाथ आल्हाट, पुणे जिल्हा उपाध्यक्ष अल्लाउद्दीन अल्वी, सचिव इन्सार शेख व इतर मान्यवर उपस्थित होते.

पळशीत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम संपन्न

मतदार यादीतील नोंदींची पडताळणी; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

■ लोणी भापकर (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील पळशी येथे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीचे पुनरीक्षण नुकतेच करण्यात आले.या कार्यक्रमात स्वाक्षरीयुक्त गणना अर्ज प्राप्त झालेल्या मतदारांकडून आवश्यक फॉर्म भरून घेण्यात आले. तसेच मतदारांनी सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांची सत्यता संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तपासण्यात आली.मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्याच्या उद्देशाने या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मतदारांकडून आवश्यक माहिती व कागदपत्रे स्वीकारून त्यांची पडताळणी करण्यात आली.मतदार यादीतील नोंदींमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या, बदल अथवा अद्ययावत माहितीची प्रक्रिया यावेळी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान मतदारांना पुनरीक्षण प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. मतदारांनीही आपल्या नावाची नोंद, पत्ता तसेच इतर आवश्यक तपशीलांची माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्यांकडे कागदपत्रे सादर केली.त्यामुळे या कार्यक्रमाला पळशी परिसरातील मतदार व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी सचिन हाके, सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद तावरे, भालचंद्र तावरे, शिल्पा शिंदे,माणिक काळे, बाळू बंडगर, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मुरलीधर हिरवे, भाऊसाहेब केसकर आदी उपस्थित होते.यावेळी मतदार,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



बारामती तालुका महिला अध्यक्षपदी सुनिता डोंबाळे यांची निवड

बारामती : दैनिक संध्या

माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र संघटनेच्या बारामती तालुका महिला अध्यक्षपदी पाटस येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनीता डोंबाळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी डोंबाळे यांना नियुक्तीपत्र दिले. दौंड, बारामती तालुक्यात सामाजिक,वैद्यकीय व राजकीय क्षेत्रात डोंबाळे यांनी उल्लेखनीय कार्य केल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली.माहिती अधिकार आणि पत्रकारिता कार्यरत असताना येणाऱ्या अडीअडचणी सोडवत माहिती अधिकार आणि पत्रकारितेची चळवळ सक्षम आणि सशक्त करण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या मार्गदर्शनात आणि सहमतीने तसेच विकास क्षत्रिय (पुणे जिल्हाध्यक्ष) यांच्या शिफारशीनुसार माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीच्या बारामती तालुका महिला अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यामुळे सुनिता डोंबाळे यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

लासुर्णे ग्रामपंचायतीवर प्रशासक राज; कारभार प्रशासकीय यंत्रणेकडे

लासुर्णे : दैनिक संध्या

इंदापूर तालुक्यातील लासुर्णे ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर ग्रामपंचायतीचा कारभार आता प्रशासकांच्या हाती सोपविण्यात आला आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विस्तार अधिकारी भिवा काळे यांची लासुर्णे ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर निवडणूक प्रक्रिया लांबल्याने प्रशासकीय कामकाजाबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. आता प्रशासक नियुक्त झाल्याने ग्रामपंचायतीचे दैनंदिन शासकीय कामकाज सुरळीत होण्यास मदत होणार आहे. भिवा काळे यांच्याकडे लासुर्णेसह निमगाव केतकी, निमसाखर, सणसर आणि तावशी या गावांच्या प्रशासकीय जबाबदारीचीही सोपवणूक करण्यात आली आहे. दरम्यान, लासुर्णे गावातील प्रलंबित विकासकामे यांना प्रशासकांच्या कार्यकाळात कितपत गती मिळते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

जनाई-शिरसाई योजनेच्या पाण्यासाठी शेतकरी आक्रमक

पुरंदर : दैनिक संध्या

जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरेसे व नियमित पाणी मिळावे, या मागणीसाठी शेतकरी संघर्ष कृती समितीने आता निर्णायक आंदोलनाची भूमिका घेतली आहे. महात्मा गांधी जयंतीदिनी बारामती तालुक्यातील सुपे येथे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे समितीने जाहीर केले आहे. "आता आश्वासन नको, प्रत्यक्ष पाणी हवे" अशी भूमिका घेत शेतकरी संघर्ष कृती समितीने जनाई-शिरसाई योजनेतील विविध प्रश्न प्रशासनासमोर मांडले आहेत. श्री शहाजीराजे भोसले यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत हे आंदोलन होणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये बंद पाइपलाइनमुळे वाया जाणारे पाणी पुणे महानगरपालिकेला न देता कार्यक्षेत्रातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी उपलब्ध करून देणे, बंद पाइपलाइन सुरू करताना तलावांची साठवण क्षमता लक्षात घेऊन आवश्यक त्या व्यासाची पाइपलाइन करणे, तसेच जुन्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे, या मागण्यांचा समावेश आहे. तसेच पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी जनाई-शिरसाईतील तलावांमध्ये साठवण्यासाठी बंधारा व पंपगृह उभारावे, जनाई-शिरसाई योजना पूर्णपणे सौरऊर्जेवर आणावी, शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी वर्षभराचे नियोजन करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. योजनेचे पाणी तलावात शिल्लक असताना स्थानिक शेतकऱ्यांकडून पंप बंद पाडले जात असल्याचा आरोपही समितीने केला असून, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे. योजनेतील स्थायीस्वरूपी पाणी थेट शेतापर्यंत पोहोचविण्यासाठी बंदिस्त पाइपलाइनद्वारे नाले, बंधारे व तलाव भरून देण्याचे नियोजन करण्याची मागणीही करण्यात आली आहे. जनाई-शिरसाई योजनेचे कार्यालय सुपे येथेच करण्यात यावे, तसेच वडगाव तलावाची साठवण क्षमता कमी असल्यामुळे पाणी पुरेसे मिळत नसल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशीही मागणी समितीने केली आहे.

मुर्टीत वनगायींचा धुमाकूळ; बाजरीसह अन्य पिकांचा फडशा!

एक एकराहून अधिक क्षेत्रातील पिकांचे नुकसान; शासकीय विभागांच्या टोलवाटोलवीमुळे शेतकरी हवालदिल

■ मुर्टी (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील मुर्टी,मोढवे आणि जोगवडी गावांच्या सीमेलगत असलेल्या वनगायींनी परिसरातील शेतशिवारात धुमाकूळ घातला असून,बाजरी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे.आधीच कमी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या वनगायींनी हिरावून घेतल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मुर्टी नजीकच्या सोनवलकरवस्ती येथील गट क्रमांक ११७ मधील अक्षय जगदाळे यांच्या शेतातील एक एकराहून अधिक क्षेत्रातील बाजरी पिकाचे वनगायींनी मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. याशिवाय रामभाऊ सोनवलकर,भगवान सोनवलकर,बापू सोनवलकर आणि बाळू सोनवलकर यांच्या शेतातील पिकांचीही नासधूस करून वनगायींनी पिकांचा फडशा पाडल्याची माहिती संबंधित शेतकऱ्यांनी दिली.बारामती तालुक्याच्या पश्चिम जिरायती भागात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.अशा परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा वापर करून बाजरीची पिके घेतली होती.काही शेतकऱ्यांनी पुरंदर उपसा सिंचन योजनेचे पाणी विकत घेऊन ऊस आणि बाजरीची पिके अंतिम टप्प्यापर्यंत आणली होती. मात्र, ऐन पीक काढणीच्या टप्प्यात वनगायींच्या कळपाने शेतात घुसून पिकांची नासधूस केल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वनगायींच्या वाढत्या उपद्रवाबाबत संबंधित शेतकऱ्यांनी वनविभाग,कृषी विभाग आणि महसूल विभागाकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत.यापूर्वी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्याकडेही या समस्येबाबत व्यथा मांडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र,अद्याप या समस्येवर ठोस उपाययोजना झालेली नसल्याची त्यांची तक्रार आहे.

कृषी विभागाकडून हा विषय आपल्या अखत्यारीत येत नसल्याचे सांगितले जाते,तर महसूल विभागाकडून ही बाब वनविभागाशी संबंधित असल्याचे स्पष्ट केले जाते. दुसरीकडे, वनविभागाकडून या वनगायी नसल्याचे सांगितले जात असल्याने शेतकऱ्यांसमोर नेमकी दाद मागायची कुणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे दुष्काळी परिस्थिती, दुसरीकडे पिकांसाठी विकत घेतलेल्या पाण्याचा खर्च आणि आता वनगायींकडून होणारे नुकसान, अशा दुहेरी-तिहेरी संकटात जिरायती भागातील शेतकरी सापडले आहेत.

वारंवार पिकांचे नुकसान होत असल्याने शेती करावी तरी कशी,असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.वनगायींच्या उपद्रवावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी,तसेच नुकसानग्रस्त पिकांचे शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती मदत द्यावी, अशी मागणी मुर्टी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

आळंदीत इंद्रायणी घाटासह शाळा परिसराची स्वच्छता

■ आळंदी (दै. संध्या)




'स्वच्छता ही सेवा २०२६' आणि 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत आळंदी नगरपरिषदेच्या वतीने 'एक दिवस, एक साथ, एक तास' या संकल्पनेतून गुरुवारी (१) महा-स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. इंद्रायणी नदी घाट परिसरासह शहरातील विविध शाळांच्या परिसरात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत विद्यार्थी, शिक्षक, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी अशा एकूण १ हजार ६८३ जणांनी सहभाग घेतला. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक रामभाऊ भोसले यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अजित वडगावकर, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक विजय गुळवे यांच्यासह विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षकांनी मोहिमेत सहभाग घेतला.

मोहिमेदरम्यान इंद्रायणी नदी घाट परिसर तसेच सहभागी शाळांच्या परिसरातील कचरा संकलन, साफसफाई आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. या स्वच्छता मोहिम योजनेत ज्ञानेश्वर विद्यालय, एमआयटी कॉलेज, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल, ज्ञानसाई विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, श्री निकेतन गुरुकुल विद्यालय, श्रीमती भिमाबाई सोपानराव उपाध्ये इंग्लिश मीडियम स्कूल, आळंदी नगरपरिषद शाळा मधील विद्यार्थी सहभागी झाले. शैक्षणिक संस्थांमधून एकूण १ हजार ६०३ जण, तर नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी असे ८० जण सहभागी झाले.

स्वच्छता ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग व्हावी, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला. आळंदी शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी नागरिक, शैक्षणिक संस्था आणि नगरपरिषद यांच्या संयुक्त सहभागातून स्वच्छता उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले.

एक हवालदार रंगेहाथ जेरबंद, दुसरा ९५ हजारांसह पसार

■ शिरूर (दै. संध्या)



या दोन्ही कारवाया पुणे परिक्षेत्राचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील व उपअधीक्षक सतीश वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या. पहिल्या कारवाईत पोलीस निरीक्षक आसावरी शेडगे, पोलीस शिपाई अश्विन कुमकर, पोलीस शिपाई विकास आडके व चालक पोलीस हवालदार सोनवणे यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या कारवाईत पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे, पोलीस हवालदार प्रवीण तावरे, पोलीस शिपाई बाळासाहेब गदादे व चालक ऋषिकेश अभंग यांनी कारवाई केली.

शिरूर पोलीस ठाण्यातील दोन वेगवेगळ्या प्रकरणांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अवघ्या २४ तासांत दोन हवालदारांविरोधात कारवाई केल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. एका कारवाईत हवालदार शिवाजी बनकर याला ११ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले, तर दुसऱ्या कारवाईत हवालदार सतीश मुंढे हा ९५ हजार रुपयांची लाच स्वीकारल्यानंतर एसीबीच्या पथकाची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेत रकमेसह पसार झाल्याचे एसीबीच्या कारवाईत समोर आले आहे. पहिल्या प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात एका २९ वर्षीय तक्रारदारासह त्याच्या आई-वडिलांविरुद्ध १९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास हवालदार शिवाजी ज्योतीराम बनकर याच्याकडे होता. गुन्ह्यात अटक न करता कायदेशीर नोटीस देण्यासाठी तसेच प्रकरणात मदत करण्यासाठी बनकर याने १५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. तक्रारदाराकडून यापूर्वी काही रक्कम स्वीकारल्यानंतर उर्वरित रकमेची मागणी करण्यात आल्याचे एसीबीच्या पडताळणीत निष्पन्न झाले. २९ सप्टेंबर रोजी एसीबीने लाच मागणीची पडताळणी केली. त्यानंतर ३० सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास जुन्या शिरूर पोलीस ठाण्याबाहेरील रस्त्याच्या कडेला तक्रारदाराकडून ११ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने शिवाजी बनकर याला पंचांसमक्ष रंगेहाथ पकडले. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, याच कालावधीत शिरूर पोलीस ठाण्याशी संबंधित दुसऱ्या प्रकरणात हवालदार सतीश नाथाराव मुंढे याच्याविरोधातही एसीबीने कारवाई केली. एका ५९ वर्षीय तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी तसेच अटक टाळण्यासाठी मुंढे याने सुरुवातीला एक लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार करण्यात आली होती.३० सप्टेंबर रोजी टाकळी हाजी पोलीस चौकी येथे एसीबीने केलेल्या पडताळणीत तडजोडीनंतर ९५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याचे एसीबीने म्हटले आहे. या रकमेमध्ये स्वतःसाठी तसेच वरिष्ठांच्या नावाचा उल्लेख करण्यात आल्याचेही एसीबीच्या कारवाईत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर रात्री टाकळी हाजी पोलीस चौकी येथे ९५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारल्यानंतर एसीबीच्या पथकाची चाहूल लागताच सतीश मुंढे हा अंधाराचा फायदा घेत लाचेच्या रकमेसह पसार झाल्याचे समोर आले. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम २३८ अन्वये कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे एसीबीकडून सांगण्यात आले.

थोडक्यात पण महत्वाचे



उच्च सुविधांचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी कौशल्य सिद्ध करावे - हर्षवर्धन पाटील

पिंपरी, पुणे : दैनिक संध्या

भविष्यातील तंत्रज्ञानाशी समन्वय साधणाऱ्या "इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजीज सेंटर ऑफ एक्सलन्स"या अत्याधुनिक सुविधा पिंपरी चिंचवड विद्यापीठ परिसरात उपलब्ध करून देणे हा अत्यंत आनंदाचा क्षण आहे. येथे विद्यार्थ्यांना नवोन्मेषाचे प्रत्यक्ष प्रयोग करण्यासाठी आणि अनुभव घेण्यासाठी संधी मिळेल. या उच्च तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा आणि आपले कौशल्य सिद्ध करावे. हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या अंगभूत संशोधन आणि उद्योजक गुणांना संधी उपलब्ध करून देणारे व्यासपीठ ठरेल असे पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ कॅम्पस मध्ये "इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजीज सेंटर ऑफ एक्सलन्स" चे उद्घाटन पीसीयूचे कुलपती व पीसीइटी चे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, ज्येष्ठ उद्योजक पद्मश्री प्रतापराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, पीसीयु व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, आयटी आणि आयटीईएस प्रमुख डॉ.रामकृष्ण वडाली, पीसीयू फोर्ब्स मार्शल प्रमुख राजेश पाटील, सीइओ फाउंडर ऑफ डिजिटेक रोबोटिक इंडियाचे अजित गटे, लि आम, गजानन पाटील आदी उपस्थित होते. पद्मश्री उद्योजक प्रतापराव पवार यांनी सांगितले की, एआय, रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेमी कंडक्टर आणि इलेक्ट्रिक व्हेईकल यांसारखी क्षेत्रे भविष्यातील उद्योग विश्वात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ संस्था आणि विद्यापीठ यांच्यातील सहकार्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक आणि रोजगार वाढीस चालना देणारे ठरेल. पीसीयू ने भविष्यातील गरजा ओळखून सुरू केलेला "इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजी सेंटर ऑफ एक्सलन्स" हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या आणि उद्योगाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा ठरेल.

कॉमनवेल्थ स्पर्धेत डॉक्टर शर्वरी इनामदार यांची नऊ सुवर्णपदकांची कमाई

पुणे : दैनिक संध्या




विनिपेग, कॅनडा येथे झालेल्या कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टिंग व बेंच प्रेस स्पर्धेत पुण्याच्या डॉ. शर्वरी इनामदार यांनी भारतासाठी नऊ सुवर्णपदके व एक रजतपदक पटकावले. यासोबतच नवीन कॉमनवेल्थ रेकॉर्ड देखील नोंदविले. विविध कॉमनवेल्थ देशांमधील सुमारे ८०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. ५७ किलो एम१ महिला गटात डॉ. शर्वरी इनामदार यांनी क्लासिक पॉवरलिफ्टिंग प्रकारात स्क्वॉट, बेंच प्रेस आणि डेडलिफ्टमध्ये मिळून एकूण ३७२.५ किलो वजन उचलत तीन सुवर्णपदके व एक रजतपदक पटकावले. इक्विप्ड पॉवरलिफ्टिंगमध्ये एकूण ४२७.५ किलो वजन उचलत नवीन कॉमनवेल्थ टोटल रेकॉर्ड नोंदविले. इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग प्रकारात भारतासाठी चार सुवर्णपदके व बेस्ट लिफ्टर कॉमनवेल्थ फर्स्ट रनर अप अशी कामगिरी केली. क्लासिक बेंच प्रेस ओन्ली प्रकारात ७५ किलो, तर इक्विप्ड बेंच प्रेस प्रकारात ९५ किलो वजन उचलून दोन्ही प्रकारांतही सुवर्णपदक मिळवले. पॉवरलिफ्टिंगच्या चारही प्रकारांत भारतासाठी नऊ सुवर्णपदके व एक रजतपदक, बेस्ट लिफ्टर किताब आणि कॉमनवेल्थ रेकॉर्ड असे दमदार यश मिळवले. डॉ.शर्वरी इनामदार सदाशिव पेठ येथे खेळाडूंसाठी व मेटाबोलिक डिसऑर्डरसाठी आहार आयुर्वेद नावाचे क्लिनिक चालवतात. पुण्याच्याच मुक्ता फाटक यांनी ६३ किलो ओपन महिला गटात क्लासिक बेंच प्रेस प्रकारात ६५ किलो वजन उचलून पाचवा क्रमांक मिळवला. इक्विप्ड बेंच प्रेस स्पर्धेत ८७.५ किलो वजन उचलत कांस्यपदक मिळवले. डॉ. शर्वरी इनामदार आणि मुक्ता फाटक या दोघीही पुण्याच्या कोड ब्रेकर जिममध्ये सराव करतात.

नागरिक देताहेत ऑक्टोबर हिटशी सामना

चाकण : दैनिक संध्या

चाकण आणि परिसरात सूर्य मोठ्या प्रमाणात आग ओकू लागला असून, आता सध्या चित्र भलतेच पाहायला मिळत आहे. दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा कमालीचा वाढला असून, नागरिकांना 'ऑक्टोबर हिट' शी सामना करावा लागत आहे. चाकण भागात सकाळपासूनच कडक ऊन आणि हवेतील वाढत्या आर्द्रतेमुळे नागरिक घामाघूम होत आहेत. दुपारी उन्हाच्या झळा इतक्या तीव्र होऊ लागल्या आहेत की रस्त्यांवर वाहनांची आणि पादचाऱ्यांची वर्दळ मंदावल्याचे दिसून येत आहे. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे पंखे, कुलर आणि एसीचा वापर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. थंड पेये आणि लिंबू सरबताच्या गाड्यांवर मोठ्या प्रमाणात ग्राहकांची वर्दळ वाढू लागली आहे. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे डिहायड्रेशन, डोकेदुखी, थकवा आणि त्वचेचे विकार यांसारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जेजुरी देवस्थानचे माजी विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांना अटक



पुरंदर : दैनिक संध्या

पुणे महापालिकेतील कथित बनावट नोकरभरती प्रकरणाच्या तपासात शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई करत जेजुरी येथील श्री मार्तंड देव संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. राजेंद्र बबनराव खेडेकर यांना अटक केली आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार आरोप असा आहे की - पुणे महापालिकेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून बेरोजगार उमेदवारांना बनावट नियुक्तीपत्रे आणि कागदपत्रे दिल्याचा कथित प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात महापालिकेचे बनावट शिक्के व कागदपत्रे वापरण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या गुन्ह्यात यापूर्वी सात जणांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधितांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. न्यायालयाने अर्ज फेटाळल्यानंतर पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अटकेची कारवाई केली. अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना ३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली आहे. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, एकूण कथित फसवणूक झालेल्या उमेदवारांची संख्या आणि आणखी कोणी सहभागी आहे का, याबाबत शिवाजीनगर पोलीस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणाचा तपास सुरू असून, अंतिम सत्य न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होईल.

समर नखाते यांचा अमृतमहोत्सवी गौरव

मनोरंजनाच्या पलीकडचा सिनेमा समोर आणणारे प्रा. समर नखाते - डॉ. मोहन आगाशे

कुलगुरु धीरज सिंग, फेडरेशनचे उपाध्यक्ष वीरेंद्र चित्रपट

■ पुणे (दै. संध्या)

मनोरंजनाच्या पलीकडचा सिनेमा रसिकांसमोर आणत चित्रपट वेगळ्या नजरेने कसा पाहावा, याची जाणीव निर्माण करणारे ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक प्रा. समर नखाते यांचे चित्रपट क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी केले.

प्रा. समर नखाते यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त चित्रपट रसास्वाद शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचा डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी वेस्टर्न रिजन, महाराष्ट्र कल्चरल सेंटर, एनएफडीसी आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने पौड रोड येथील अर्काईव्ह थिएटरमध्ये हा कार्यक्रम झाला. दि. १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान हे चित्रपट रसास्वाद शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

डॉ. आगाशे म्हणाले,"समर नखाते केवळ चित्रपट अभ्यासक नाहीत, तर चित्रपटाचा रसास्वाद घेण्याची दृष्टी निर्माण करणारे मार्गदर्शक आहेत. मनोरंजनाच्या पलीकडचा सिनेमा ते जगतात. त्यामुळे त्यांनी चित्रपटाचा करून दिलेला रसास्वाद सर्व वयोगटांतील व्यक्तींना भावतो आणि सिनेमा वेगळ्या नजरेने कसा पाहायचा, याची जाणीव होते." प्रा. नखाते यांनी पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट रसास्वादाची गोडी नव्या पिढीपर्यंत पोहोचवली आहे. एफटीआयआयचे माजी डीन, पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे क्रिएटिव्ह डायरेक्टर तसेच चित्रपट शिक्षण क्षेत्रातील मार्गदर्शक म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या या दीर्घ योगदानाचा गौरव म्हणून अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी अभिनेत्री अश्विनी गिरी, राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे (एनएफडीसी) व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम, चित्रपट रसास्वाद शिबिराचे आयोजक सतीश जकातदार, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट चे कुलगुरु धीरज सिंग, फेडरेशनचे ऑफ फिल्म सोसायटीच्या वेस्टन रिजनचे उपाध्यक्ष विरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते. अश्विनी गिरी आणि दीपक देवधर, सतीश जकातदार यांनी प्रा. नखाते यांच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करुन दिला. प्रकाश मकदूम यांनी समर नखाने आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे ऋणानुबंध उलगडून दाखविले. सत्काराला उत्तर देताना प्रा. समर नखाते म्हणाले, "आयुष्यात प्रत्येक गोष्टीचा रसास्वाद घेत आलो आणि आनंदाने गोष्टी स्वीकारल्या. या सर्व गोष्टी मला लाभल्या, त्यामागे एक समान धागा होता—नाती. योग्य वेळी योग्य व्यक्तिमत्त्वे भेटत गेली आणि त्यातून मी घडत गेलो. त्यामुळे आजच्या माझ्या वाटचालीबद्दल मी समाधानी आहे." या शिबिरात चित्रपटाची भाषा, चित्रपटाचा इतिहास आणि चित्रपटाचे आकलन याबाबत चित्रपटप्रेमींना मार्गदर्शन मिळणार आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे या उपक्रमास विशेष सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास किर्लोस्कर यांनी केले.

भुयारी मार्ग उभारण्याची उपमहापौर परशुराम वाडेकर यांची मागणी

■ पुणे (दै. संध्या)

खडकी रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी रेल्वे फाटकाजवळ नवीन प्रशस्त भुयारी मार्ग (अंडरपास) उभारण्याची मागणी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पुणे महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी केली आहे. तसेच या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) यांनाही निवेदन देण्यात आले आहे. या बाबत संबंधितांना दिलेल्या पत्रात उपमहापौर वाडेकर यांनी म्हटले आहे की, खडकी रेल्वे स्थानक हे सध्या महत्त्वाचे जंक्शन झाले असून दररोज अनेक एक्स्प्रेस गाड्या येथे थांबतात. अलीकडे उत्तर भारतात जाणाऱ्या काही रेल्वेगाड्या या पुणे स्टेशन ऐवजी खडकी येथून सोडल्या जात आहेत त्यामुळे स्थानक परिसरात प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. रेल्वे स्थानकाजवळील जुने रेल्वे फाटक बंद असताना औंध, सांगवी, बाणेर, बोपोडी, खडकी बाजार आदी भागांतून ये-जा करणाऱ्या हजारो नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. खडकी पोलिस स्टेशनजवळील जुना रेल्वे बोगदा अत्यंत अरुंद असून या मार्गावर सतत पाणी साचत असल्याने वाहतुकीस मोठ्या अडचणी निर्माण होतात. वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता हा बोगदा दुरुस्त करूनही वाहतुकीची समस्या कायम राहण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संवेदनशील कुशल अभियंता अशी प्रतिमा तयार करा - डॉ. हरीश तिवारी

■ पिंपरी, पुणे (दै. संध्या)

अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साध्य करीत असताना समाजामध्ये जबाबदार, संवेदनशील आणि कुशल अभियंता अशी आपली प्रतिमा तयार करावी. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, नव कल्पना आणि उद्योग संपर्क यांच्या माध्यमातून आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन पीसीसीओईआर चे संचालक व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे मेकॅनिकल, सिव्हिल, इ अँड टीसी आणि आयटी या विभागांच्या प्रथम वर्ष बी. टेक. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ समारंभात डॉ. तिवारी बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे असोसिएट डीन डॉ. राहुल मापारी, पीसीईटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डीन डॉ. शितलकुमार रवंदळे, विभाग प्रमुख प्रा. शीतल पाटील, इंडक्शन प्रोग्राम समन्वयक प्रा. प्रिया ओघे, पालक प्रतिनिधी अशोक अरळी, विविध विभागाचे प्रमुख प्राध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी जीवनात शिस्त, नैतिक मूल्य, सातत्य याचे आचरण करून ज्ञानार्जन, नवकल्पना, तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करीत करिअर घडवावे. सध्या तंत्रज्ञान विकासाचा आणि बदलाचा वेग लक्षणीय आहे, त्यामुळे सर्वच उद्योग क्षेत्रातील कंपन्यांच्या अभियंत्यांकडून अपेक्षा वाढत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उपलब्ध करिअर संधींचा लाभ घ्यावा. पालक प्रतिनिधी अशोक अरळी यांनी येथील शैक्षणिक उपक्रमांचे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे आणि करिअर साठी उपलब्ध विविध संधींचे कौतुक केले. मेकॅनिकल, सिविल, इ अँड टीसी आणि आयटी या शाखांमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी देखील विद्यार्थ्यांचे स्वागत करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्वागत प्रा. प्रिया ओघे, सूत्रसंचालन प्रा. शीतल पाटील यांनी केले.



प्रभात मित्र मंडळात ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा

■ मुंबई (दै. संध्या)

वयाची नव्वदी ओलांडूनही उत्साह कायम ठेवलेल्या ज्येष्ठांचा सन्मान आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन अशा उपक्रमांनी विक्रोळी-कन्नमवार नगर येथील प्रभात मित्र मंडळात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ९८ वर्षीय सूर्यकांत तुकाराम शेट्ये, ९३ वर्षीय खंडू विठ्ठल अंकुश आणि ९२ वर्षीय परशुराम बाळा काळे यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व टोपी देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला दै. लोकवाहिनीचे निवासी संपादक प्रसाद प्रफुल्लकुमार मोकाशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव तथा ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, खजिनदार गौतम नि. डांगळे, माजी अध्यक्ष सुरेश सरनोबत यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

"ज्येष्ठ नागरिकांची पहिली इनिंग यशस्वी झाली आहे; आता दुसरी इनिंग सुरू



■ नव्वदी पार ज्येष्ठांचा सन्मान

झाली आहे. या इनिंगमध्ये छंद जोपासत सक्रिय राहा आणि आपले अनुभव इतरांना द्या. त्यामुळे पुढील आयुष्य अधिक आनंददायी होईल," असे मोकाशी यांनी सांगितले. "आम्हीही घरातील ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेतच घडलो आहोत. आता तुम्ही ज्येष्ठ झाला आहात. त्यामुळे तुमच्या अनुभवातून पुढच्या पिढीला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी तुमची आहे," असेही त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ नागरिकांना विविध सुविधांसाठी बाहेर धावपळ करावी लागू नये, यासाठी प्रभात मित्र मंडळाने अधिकाधिक लोकोपयोगी उपक्रम राबवावेत, असा सल्ला मोकाशी यांनी दिला. प्रभात समयातील मंडळाच्या ज्येष्ठ गायकांनी सादर केलेल्या गीतांचेही त्यांनी कौतुक केले. या निमित्ताने फॅमिली डॉक्टर डॉ. हरीश पांचाळ आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या एनईबीएस शाखेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. नेत्रचिकित्सक डॉ. क्षितीज पारेख तसेच कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. विशाल नायर यांनी ज्येष्ठांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश सरनोबत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अरुण लोखंडे, सुरेश नलावडे, विलास देशनेहरे, बाबूराव सणस आदींनी परिश्रम घेतले.

भारतीय नौदल आणि टीव्हीएस मोटर यांची 'फ्लीट टू फोर्ट्स' संयुक्त मोहीम

■ मुंबई/बेंगळुरू (दै. संध्या)



दुचाकी आणि तीन-चाकी वाहनांचे नामांकित जागतिक उत्पादक असलेल्या टीव्हीएस वेणू (TVS VENU) समूहातील टीव्हीएस मोटर कंपनीच्या सहकार्याने, भारतीय नौदलाने आज मुंबईतील नेव्हीनगर येथील कोहली स्टेडियमवरून फ्लीट टू फोर्ट्स (Fleet to Forts) या मोटरसायकल मोहिमेला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. 14 दिवस चालणाऱ्या या मोहिमेत 1600 कि.मी.हून अधिक अंतर कापले जाईल आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित १० किल्ल्यांना भेटी दिल्या जातील; यामध्ये भारतातील मराठा लष्करी स्थापत्य (Maratha Military Landscapes of India) या नामांकनांतर्गत युनेस्कोच्या (UNESCO) वारसा यादीत नुकत्याच समाविष्ट करण्यात आलेल्या किल्ल्यांचाही समावेश आहे. तसेच, या मोहिमेद्वारे तरुणांमध्ये भारतीय नौदलातील करिअरच्या संधींविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे; यात विशेषतः अग्निपथ योजनेवर - सशस्त्र दलांमध्ये अधिकारी-पदाखालील कर्मचाऱ्यांच्या अल्प-मुदतीच्या भरतीसाठी भारत सरकारने सुरू केलेल्या योजनेवर भर दिला जाणार आहे.

कॅप्टन शेखर देशपांडे यांच्या नेतृत्वाखालील 25 सदस्यीय या तुकडीमध्ये अधिकारी, खलाशी आणि अग्निवीर यांचा समावेश आहे. यात महिला अधिकारी, महिला अग्निवीर आणि नौदल समुदायातील महिलांचाही समावेश असून, त्याद्वारे भारतीय नौदलाचा 'नारी शक्ती'वरील भर अधोरेखित होतो.

मोईसह पीएमआरडीए हद्दीत अग्निशमन केंद्रे उभारा!

आगीची वाट पाहू नका : चाकणमधील आगीच्या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांची मागणी

जोखमीचे सर्वेक्षण करून आपत्कालीन प्रतिसादाचा कालबद्ध आराखडा तयार करण्याची सूचना

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (PMRDA) हद्दीत नागरी वसाहती, उद्योग, गोदामे आणि व्यावसायिक आस्थापनांचा वेगाने विस्तार होत असताना अग्निशमन केंद्रांची उपलब्धता आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेचा विभागनिहाय आढावा घ्यावा. मोईसह गरज असलेल्या भागांत नवीन अग्निशमन केंद्रे किंवा उपकेंद्रे उभारावीत, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

चाकण एमआयडीसीतील चिंबळी फाटा परिसरात ९ सप्टेंबर रोजी आर. आर. पॅकेजिंग कंपनीला लागलेल्या आगीचा परिणाम शेजारील कंपन्यांवरही झाला होता. आग आटोक्यात आणण्यासाठी



पीएमआरडीएसह पिंपरी-चिंचवड महापालिका, आळंदी नगर परिषद आणि एमआयडीसीच्या अग्निशमन दलांना संयुक्तपणे काम करावे लागले. अग्निशमन जवानांच्या कामाचे कौतुक करतानाच वाढत्या औद्योगिक विस्तारानुसार केंद्रे, साधनसामग्री आणि यंत्रणांमधील समन्वय मजबूत करणे गरजेचे असल्याचे लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे.

कुदळवाडीतील अतिक्रमणविरोधी कारवाईनंतर काही भंगार व्यावसायिक मोई व आसपासच्या भागात स्थलांतरित झाल्याचे निदर्शनास येत असल्याचा उल्लेखही त्यांनी केला आहे. त्यामुळे भंगार साठवणूक, पत्राशेड आणि लगतच्या वस्तीची प्रत्यक्ष पाहणी करून आगीचा धोका तपासावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

चाकण एमआयडीसीच्या हद्दीबाहेरील लहान उद्योग, कार्यशाळा आणि गोदामांसाठीही स्वतंत्र अग्निसुरक्षा नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यमान केंद्रांमधून घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष वेळ, रस्त्यांवरील अडथळे, पाण्याची उपलब्धता आणि भागनिहाय जोखीम यांचे सर्वेक्षण करावे. त्यानुसार नवीन केंद्रांसाठी जागा, निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ, वाहने आणि बचाव उपकरणे निश्चित करावीत, असे लांडगे यांनी सुचवले आहे.

पीएमआरडीए, एमआयडीसी, स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस आणि आरोग्य विभागाची संयुक्त बैठक घेऊन आपत्कालीन प्रतिसाद आराखडा तयार करावा व नियमित सरावाचे नियोजन करावे. प्रस्तावित अग्निशमन केंद्रांचा कालबद्ध आराखडा आणि सर्वेक्षणाचे निष्कर्ष लेखी स्वरूपात कळवावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.


> "अग्निशमन जवान तत्परतेने काम करत आहेत. मात्र, वाढत्या वसाहती आणि उद्योगांपर्यंत मदत वेळेत पोहोचण्यासाठी जवळची केंद्रे, पुरेशी साधनसामग्री आणि सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. मोईसह जोखीम असलेल्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करून नवीन अग्निशमन केंद्रांचा कालबद्ध आराखडा निश्चित करावा. यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहोत."
>
> **— महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



डिजिटल युगात सतर्क राहा : वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख

पुणे : दैनिक संध्या

सध्या मोबाइल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरासोबत ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. अनोळखी लिंकवर क्लिक करणे, ओटीपी शेअर करणे, लाइव्ह लोकेशन टाकणे तसेच अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करणे, सोशल मीडियावर कोणतीही माहिती किंवा फोटो शेअर करण्यापूर्वी दोनदा विचार करावा आणि डिजिटल माध्यमांचा वापर जबाबदारीने करावा. बदल स्वतःपासून सुरू करा, असे आवाहन नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख यांनी केले. महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नऱ्हे येथील ओएसिस कॉलेज ऑफ डिझाईन अँड टेक्नॉलॉजी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी वर्षा देशमुख बोलत होत्या. या कार्यक्रमास नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी, पोलीस हवालदार उर्मिला काकडे, कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना, संयोजक विजया गुजराथी आणि आस्ता जूनगडे, प्रीती भाटकर, श्रुती बजाज, शुभांगी जवळगेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनकार्याचा, सत्य, अहिंसा, साधेपणा आणि देशसेवेच्या विचारांचा गौरव करण्यात आला. कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना म्हणाल्या, "महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश संपूर्ण जगाला दिला. आजच्या डिजिटल युगातही गांधीजींचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सत्य, शिस्त, अहिंसा आणि सामाजिक जबाबदारी जपली पाहिजे. गांधीजींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे," असे प्रतिपादन प्राचार्या अश्विनी दौलत बाफना यांनी केले.

सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या दोघांना एक वर्षाचा कारावास

जुन्नर : दैनिक संध्या

सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी आळेफाटा पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील दोन आरोपींना जुन्नर येथील न्यायालयाने एक वर्षाचा साधा कारावास व प्रत्येकी ५ हजार रुपये दंड, व दंड न भरल्यास अतिरिक्त तीन महिन्यांचा साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पिंपरी पेंढार, ता. जुन्नर येथील वृषाली विजय कुटे व विजय कोंडीभाऊ कुटे हे आळेफाटा पोलीस ठाण्यात आले होते. यावेळी एका अपघाताच्या कारणावरून त्यांनी पोलिसांशी हुज्जत घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप होता. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अनिल पवार यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, जुन्नर एस. बी. शेलार यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील गोकुळ खोडे यांनी कामकाज पाहिले. साक्षीदारांचे जबाब, परिस्थितीजन्य पुरावे तसेच सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून, न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषी ठरवून, दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी दोन्ही आरोपींना एक वर्षाचा साधा कारावास व प्रत्येकी ५ हजार रुपये दंड . दंड न भरल्यास अतिरिक्त तीन महिन्यांचा साधा कारावास अशी शिक्षा सुनावली. या कारवाईसाठी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक, डॉक्टर शुभम कुमार, जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री धनंजय पाटील, आळेफाटा पोलीस ठाण्याचे अधिकारी विश्वास जाधव व पैरवी अधिकारी स.पो.नि तावरे यांचे मार्गदर्शनाखाली म.पो.हवालदार मनीषा ताम्हणे, म.पो.कॉ. वृषाली भोर यांनी काम पाहिले.

श्री राजचंद्र मिशनच्या वतीने एकाच वेळी ६० समाजोपयोगी उपक्रमांची उद्घोषणा



पुणे : दैनिक संध्या

श्री राजचंद्र मिशनच्या वतीने अहो गुरूदेव सोहळ्याचे औचित्य साधून एकाच वेळी तब्बल ६० समाजोपयोगी उपक्रमांचा घोषणा नुकतीच करण्यात आली. श्री राजचंद्र मिशन धरमपूरचे प्रणेते गुरुदेव श्री राकेशजी यांनी सामाजिक, आरोग्य, शिक्षण, मानसिक आरोग्य, पशुरुग्णालय व निवारा केंद्र, विशेष मुलांसाठी शैक्षणिक सुविधा, महिला सक्षणीकरणाचे उपक्रम...अशा क्षेत्रांत हे नवे ६० उपक्रम नजिकच्या काळात कार्यरत होतील, असे जाहीर केले. गुरुदेव श्री राकेशजी यांच्या हिरक महोत्सवी वाढदिवसाचेही निमित्त या उद्घोषणेला लाभले होते. मुंबई येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे अहो गुरूदेव या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी उद्योग, विज्ञान, तंज्ञत्रान, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन, कला, राजकारण आदी क्षेत्रांतील विविध मान्यवर आवर्जून उपस्थित होते. तसेच या सोहळ्यासाठी जगभरातील २४ देशांमधून आणि २१४ शहरांमधून मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित होते. उद्घोषित नव्या उपक्रमांमध्ये प्रामुख्याने आरोग्य, सेवाकार्य आणि अध्यात्म, या क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. कर्करोग रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, प्राणी रुग्णालये व निवारा केंद्रे, विशेष मुलांसाठी सुविधा केंद्रे आणि महिला सबलीकरणासाठीचे उपक्रम प्राधान्यक्रमावर असल्याचे गुरुदेवांनी जाहीर केले. आध्यात्मिक केंद्रांसह ध्यानकेंद्रे, सहा नवीन सत्संग केंद्रे यांसह श्री गुरुदेवांच्या प्रवचनांचे विविध भाषांमध्ये प्रकाशन करण्याचा उपक्रम समाविष्ट आहे, अशी माहिती देण्यात आली.

महिलांशी संबंधित राज्यस्तरीय कायदे व धोरणांच्या आढाव्यासाठी चर्चासत्र

पुणे : दैनिक संध्या

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) यांच्या सहकार्याने महिलांशी संबंधित राज्यातील कायदे व धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेऊन आवश्यक शिफारसी तयार करण्यासाठी Consultation on Review of State-Specific Laws या एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, राष्ट्रीय महिला आयोग यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी एस. परशुरामन सभागृह, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस(TISS), देवनार, मुंबई येथे चर्चासत्र होणार आहे.



शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार - शरद पवार

■ वाल्हे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्यात निर्माण झालेले दुष्काळाचे संकट अत्यंत गंभीर असून बळीराजा मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यांच्या विविध मागण्यांसाठी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू," असा भक्कम दिलासा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषी मंत्री शरदचंद्रजी पवार साहेब यांनी दिला.

पुरंदर तालुक्यात दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणी दौऱ्यादरम्यान मांडकी येथील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधताना पवार हे बोलत होते. या संवादात पुरंदर तालुक्यासाठी लाभदायी ठरणाऱ्या गुंजवणी प्रकल्पासह शेती कर्ज, वीज बिल ,चारा तसेच पाणी टंचाई आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांवर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. पवार पुढे म्हणाले दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजना अक्षरशः अपुऱ्या ठरत आहेत.आम्ही सरकारकडे विविध मुद्द्यांना अनुसरून सविस्तर निवेदन पाठवले आहे. सरकारने विलंब न करता दुष्काळग्रस्त बळीराजाला प्रत्यक्ष मदत पोहचवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना वेळेत मदत न झाल्यास त्यांच्या हक्कासाठी तीव्र संघर्ष केला जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. याप्रसंगी योगेंद्र पवार, सुदामराव इंगळे, माणिकराव झेंडे, विजयराव कोलते, पुष्कराज जाधव, दत्तात्रेय चव्हाण, बाबासाहेब माहुरकर, वाल्हेचे सरपंच अतुल गायकवाड, मांडकीचे अतुल जगताप, श्रीतेज जगताप, मोहन जगताप, सतीश जगताप, विश्वास जगताप, माथाडी कामगार संघटनेचे नेते निलेश पवार यांसह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहराच्या हिरवाईसाठी सात हेक्टर जागेवर होणार ६५०० वृक्षांची लागवड

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिका आणि आनंदवन फाउंडेशन यांच्या संयुक्त पुढाकारातून शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड आणि पुर्नलागवड करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे सात हेक्टर जागेवर ६,५०० नवीन झाडे लावण्यात येणार असून, ५०० विद्यमान झाडांची पुर्नलागवड केली जाणार आहे. यासाठी नुकताच पुणे महानगरपालिका व आनंदवन फाउंडेशन यांच्यात संमती करार झाला आहे. याअंतर्गत आनंदवन फाउंडेशनच्या देखरेखीखाली सर्व्हे क्रमांक १८ येथील जागेवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. वृक्षलागवड आणि पुर्नलागवडीनंतर झाडांची देखभाल व संवर्धन करण्याची जबाबदारी पुणे महापालिकेची राहणार आहे. कोथरूडमधील जी. ए. कुलकर्णी पथ ते कर्वे पुतळा या प्रस्तावित रस्ता जोडणी प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार आहे. ही हानी भरुन काढण्याच्या दृष्टीने हा वृक्षलागवड उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. प्रस्तावित रस्त्यामुळे कोथरूडमधील अंतर्गत वाहतूक अधिक सुरळीत होऊन मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे काही झाडांवर परिणाम होणार असून, शक्य असलेल्या झाडांची पुर्नलागवड आणि निश्चित केलेल्या जागेवर अतिरिक्त वृक्षलागवड करण्यात येणार आहे. याबाबत पुणे महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, "कर्वे पुतळा परिसरातील प्रस्तावित रस्ता जोडणीमुळे कोथरूडमधील अंतर्गत वाहतूक सुधारण्यास मदत होईल. यामुळे आता वापरात असलेले रस्ते व चौकांवरील ताण कमी होईल. परिसरात वाहतूक वाढत असल्याने नवीन अंतर्गत मार्गामुळे स्थानिक वाहतुकीचे अधिक चांगले नियोजन करता येईल. पुण्याचा विकास होत असताना पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय जबाबदारी या दोन्ही गोष्टी एकत्र पुढे जाणे आवश्यक आहे. वृक्षलागवड आणि अतिरिक्त वृक्षलागवडीसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही आनंदवन फाउंडेशनचे आभारी आहोत. या जागेमुळे नियोजनबद्ध पद्धतीने काम करता येईल. झाडे लावल्यानंतर त्यांची योग्य देखभाल करणेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि त्याची जबाबदारी पुणे महापालिका पार पाडेल." आनंदवन फाउंडेशनचे संस्थापक सचिव भूपेश शर्मा म्हणाले, "वृक्षलागवड आणि पुर्नलागवडीसाठी पुणे महापालिकेला जागा उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. हा उपक्रम पुण्याच्या हरित क्षेत्रात भर घालेल आणि दीर्घकालीन देखभालीमुळे त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे." कोथरूडमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास झाल्याने लोकसंख्या आणि वाहनांची संख्या वाढली आहे. परिसरातील अनेक अंतर्गत रस्ते लहान असल्याने नागरिकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

दिव्यांग बांधवांसाठी विशेष मतदार जनजागृती व नोंदणी अभियान संपन्न

■ पुणे (दै. संध्या)



जिल्हा निवडणूक कार्यालय, पुणे अंतर्गत २०९-शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ स्वीप व्यवस्थापन कक्षाच्या वतीने शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रीय कार्यालय येथे दिव्यांग बांधवांसाठी विशेष मतदार जनजागृती व मतदार नोंदणी अभियान ११.०० वाजता संपन्न झाले. सदर अभियानास दिव्यांग बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांना मतदार नोंदणी प्रक्रिया, मतदानाचे महत्त्व तसेच लोकशाही प्रक्रियेमध्ये दिव्यांग मतदारांचा सहभाग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मतदार यादीमध्ये आपले नाव समाविष्ट करण्याबाबत उपस्थितांनी मतदार जागृतीची प्रतिज्ञा घेतली. सदर कार्यक्रमाचे आयोजन उपजिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी मा. सचिन गोसावी, तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी बाळासाहेब ढवळे-पाटील, धनराज वाल्मिकी व श्रीमती सायली धस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.यावेळी SWEEP व्यवस्थापन कक्ष प्रमुख तथा पर्यवेक्षक आणि पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाचे मुख्य समन्वयक श्री. दीपक कदम यांनी मतदार नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या नमुना फॉर्म क्र. ६, ७ व ८ याबाबत उपस्थित दिव्यांग बांधवांना सविस्तर माहिती दिली. १८ वर्षे पूर्ण झालेल्या दिव्यांग बांधवांनी मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदवून मतदानाच्या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी श्री. धनराज वाल्मिकी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांना मतदार नोंदणी व मतदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

सोनालिकाचा ६ महिन्यांत ऐतिहासिक विक्रम

■ पुणे (दै. संध्या)



भारताचा क्रमांक १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने आपल्या शानदार ३० व्या वर्धापन दिनाच्या वर्षात कामगिरीचा स्वतःचाच मापदंड उंचावला आहे. कंपनीने केवळ ६ महिन्यांत (एप्रिल-सप्टेंबर'२६) वार्षिक (वायटीडी) १ लाख ट्रॅक्टर विक्रीचा टप्पा ओलांडला आहे. जो टप्पा गाठण्यासाठी आठ वर्षांपूर्वी एक वर्ष लागत होते, तो टप्पा कंपनीने आता केवळ निम्म्या वेळेतच गाठला आहे. यामुळे सोनालिकाच्या प्रत्येक स्तरावरील व्याप्ती, वेग आणि अंमलबजावणीची निर्णायक झेप दिसून येते. तिच्या दमदार ट्रॅक्टर्समधील सातत्यपूर्ण सुधारणा, शेतकऱ्यांशी असलेला जवळचा संवाद, उत्पादनाचे काटेकोर नियोजन आणि डीलर्समधील समन्वित अंमलबजावणी यांमुळे या कामगिरीला आधार मिळाला आहे. हे यश शेतकऱ्यांना 'स्वतःच्या विजयाचा दम' देण्याच्या सोनालिकाच्या शाश्वत भावनेचे प्रतीक आहे जेणेकरून ते शेतीमध्ये स्वतःचेच मापदंड ओलांडून उत्कृष्ट कामगिरी करू शकतील. याच भावनेतून सोनालिकाला विक्रमी कामगिरी नोंदवण्याचे बळ मिळाले असून हा ब्रँड वार्षिक ५०,००० ट्रॅक्टर विक्रीपासून केवळ ६ महिन्यांत १,००,००० ट्रॅक्टर विक्रीपर्यंत पोहोचला आहे. असाधारण यश मिळवणे ज्यामुळे शक्य होते अशा उत्कटता आणि धैर्याने सोनालिकाने सातत्याने आपल्या प्रत्येक यशाचे रूपांतर नवीन आव्हानात केले आहे. भारत सणासुदीच्या ऐन हंगामात प्रवेश करण्याच्या तयारीत असताना सोनालिकाने त्याच्या होशियारपूर येथील जगातील क्रमांक १ च्या प्लांटमध्ये १९,००० ट्रॅक्टरचे आजपर्यंतचे सर्वाधिक मासिक उत्पादन साध्य करून उत्पादनांची उपलब्धता आधीच बळकट केली आहे. तसेच, ग्राहकांच्या वाढत्या मागणीला अधिक वेगाने प्रतिसाद देण्यासाठी आपले डीलर नेटवर्क सज्ज केले आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "प्रगतीचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे जेव्हा आपण स्वतःलाच मागे टाकतो. आमच्या 'खुद से जीतने का दम' या मोहिमेमागे आम्ही जे काही आधीच साध्य केले आहे त्याच्या पलीकडे जाण्यासाठी सतत प्रयत्न करण्याचे धैर्य, जिद्द आणि अस्वस्थतेची हीच भावना आहे. जेव्हा आम्ही १,००,००० चा आकडा गाठला, तेव्हा आम्ही स्वतःला पुन्हा आव्हान दिले : आम्ही हे निम्म्या वेळेत म्हणजे ६ महिन्यांच्या आत साध्य करू शकू का? आमच्या आजपर्यंतच्या सर्वात वेगवान कामगिरीने त्या महत्त्वाकांक्षेला आज आम्ही उत्तर दिले आहे."ते पुढे म्हणाले, "आणखी पुढे जाण्याची आमची भूक जिवंत आहे आणि वाढतच आहे, हे या यशातून सिद्ध होते. आणि हे यश आपल्या सर्वांचे आहे - आयटीएलमधील प्रत्येक व्यक्तीचे, प्रत्येक चॅनल पार्टनरचे आणि ज्यांच्या प्रवासात सहभागी होण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे त्या प्रत्येक शेतकऱ्याचे. जेव्हा एखादे स्वप्न एक सामायिक महत्त्वाकांक्षा बनते, तेव्हा उत्साह संक्रामक बनतो आणि असामान्य यश मिळवणे शक्य होते. आम्ही एकत्र मिळून पुन्हा एकदा स्वतःला मागे टाकले आहे आणि आता आम्ही आपले ध्येय अधिक उंच ठेवले आहे."

हवेली, आंबेगाव व जुन्नर तालुक्यांचा यादीत सामावेश करा

आढळराव पाटील

■ चाकण (दै. संध्या)



शिरूर लोकसभा मतदार संघातील हवेली, आंबेगाव व जुन्नर तालुक्यांतील दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून संबंधित तालुके व बाधित गावांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा आणि बाधित शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व शासकीय मदत जाहीर करावी, अशी आग्रही मागणी पुणे म्हाडाचे अध्यक्ष व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंत्रालय, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना या संदर्भातील मागणीचे निवेदन दिले. त्यात त्यांनी विविध महत्त्वाच्या बाबींवर प्रकाशझोत टाकला. याविषयी माहिती देताना आढळराव पाटील म्हणाले की," महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत सप्टेंबर अखेरीस खरीप हंगाम २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुके म्हणून समावेश करून या ठिकाणी दुष्काळ निवारणासाठी विविध योजना व सवलती लागू केल्या आहेत. मात्र या तालुक्यांमध्ये शिरूर लोकसभेतील आंबेगाव, जुन्नर व हवेली तालुक्यांचा समावेश नसल्याने येथील वस्तुस्थितीची सविस्तर माहिती शासनाकडे दिली. केवळ तालुकास्तरीय सरासरी न पाहता गावनिहाय व महसूल मंडळनिहाय प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक असल्याचे मत मांडले आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व व उत्तर भागातील काही गावांमध्ये पावसातील खंड, पावसाची अनिश्चितता व पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमुळे खरीप पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. सोयाबीन, बाजरी व अन्य खरीप पिकांची स्थिती, पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा यांचा स्वतंत्रपणे आढावा घेणे आवश्यक आहे. लोणी, धामणी, शिरदाळे, मांदळेवाडी, वडगावपीर, पाहारदरा आदी गावांची प्रत्यक्ष पाहणी करणे गरजेचे आहे. तालुक्यातील सातगाव पठार हा पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेला कृषीप्रधान भाग आहे. सातगाव पठारामध्ये कुरवंडी, कोल्हारवाडी, थूगाव, भावडी, कारेगाव, पेठ व पारगाव तर्फे खेड या भागातील शेतीमध्ये बटाटा हे प्रमुख नगदी पीक असून सोयाबीन, वाटाणा, भाजीपाला व इतर पिकेही घेतली जातात. या गावांमध्ये दरवर्षी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते आणि टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता भासते.

सातगाव पठाराची दुष्काळी परिस्थिती तालुक्याच्या सरासरी आकडेवारीत झाकली जाऊ नये, यासाठी या सातही गावांची स्वतंत्र पर्जन्यमान, पीक स्थिती, जलस्रोत व पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेच्या आधारे फेरतपासणी करण्यात यावी. विशेषतः चालू खरीप हंगामातील बटाटा व इतर पिकांची प्रत्यक्ष स्थिती. पावसातील खंड आणि शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नकसान यांचे गावनिहाय पंचनामे करणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आणले. जुन्नर तालुक्याची भौगोलिक रचना आणि पर्जन्याचे असमान वितरण लक्षात घेता पश्चिम जुन्नरमध्ये समाधानकारक पाऊस झाला असला तरी पूर्वेकडील पठारी भागातील परिस्थिती वेगळी दिसून येते. विशेषतः आणे, नळावणे, शिंदेवाडी, पेमदरा, बांगरवाडी, रानमळा, बेल्हे, गुळंचवाडी, राजुरी तसेच पूर्व भागातील इतर गावांमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे खरीप पिकांना फटका बसला आहे. विशेषत: सोयाबीन पिकांवर पावसाअभावी परिणाम झाला आहे. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने पूर्व जून्नरमधील गावांचा स्वतंत्र आढावा घेणे आवश्यक आहे.

हवेली तालक्यातील ग्रामीण भागातील शेतीवरही पावसाच्या अनियमिततेचा परिणाम होण्याची शक्यता आहे. वाढते नागरीकरण, शेतीवरील पावसाचे अवलंबित्व आणि उपलब्ध जलस्त्रोतांवरील वाढता ताण लक्षात घेता ग्रामीण भागातील पीकस्थिती, पर्जन्यमान, विहिरी, बंधारे, जलसाठे व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांचे गावनिहाय मूल्यांकन करणे आवश्यक आहे. या सर्व परिस्थितीचा शासन स्तरावर विचार होऊन आंबेगाव, जुन्नर व हवेली तालुक्यांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात यावेत.

तिन्ही तालक्यांमध्ये गावनिहाय पर्जन्यमान, पावसातील खंड, पीकस्थिती, पीकनुकसान, जलसाठे भूजलस्थिती, पिण्याचे पाणी व जनावरांसाठी उपलब्ध पाणी यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्यात यावा. आंबेगाव, जुन्नर व हवेली तालुक्यांच्या व त्यातील पात्र बाधित गाव व महसूल मंडळांचा दुष्काळी उपाययोजनांमध्ये समावेश करण्याबाबत तातडीने फेरविचार करण्यात यावा. पात्र बाधित शेतकऱ्यांचे पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल शासनास सादर करण्यात यावेत. पात्र लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार जमीन महसूल सवलत देण्यात आली पाहिजे.

पीक कर्ज पुनर्गठन, कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या वीजबिलातील सवलत, रोजगार हमीची कामे, पिण्याचे पाणी, चारा व पशुधनासाठी पाणी यासारख्या उपाययोजनांचा लाभ मिळण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. तसेच आगामी रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर जलस्त्रोत व भूजलस्थितीचा आढावा घेऊन पाणी उपलब्धतेचे पूर्वनियोजन करण्यात यावे अशा स्वरूपाची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आढळराव पाटील यांनी केली आहे.